घरचा शिंपी.

भाग पहिला.



किंमत आठ आणे.

घरचाशिंपी भाग १ ला.

हें पुस्तक

बाळकृष्ण नारायण बर्वे

यांनीं तयार केलें

तें

अलीबाग येथें

सद्बोध प्रकाश छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

माघ शु० ६ शके १८२९ ता० ७ फे० सन १९०८

किंमत आठ आणे.

प्रस्तावना.

मनुष्याचें कर्तव्यकर्मा पैकीं शरीर संरक्षण हें एक कर्तव्य आहे. शरीर रक्षणा करितां शरीराच्छादन आवश्यक आहे. ज्या ज्या विशेष अवयवां सभोंवतालीं कपडे वापरावयाचे असतात त्या त्या अवयवाचे अनुरोधानें कपड्यांत निरनिराळे प्रकार बनले जातात, उदाहरणार्थ- छातीसभोंवती वापरावयाचे कपडे, बैठक व पाय या सभोंवतीं वापरावयाचे कपडे, डोक्यासभोंवतीं वापरावयाचे कपडे असे निरनिराळे प्रकार होतात.

हल्लीच्या स्थितींत मनुष्याचा कल कपडे वापरण्याकडे फार असल्या मुळें कपडा तयार करण्याची कला हीं एक महत्वाची गोष्ट झाली आहे. मराठी भाषेंत अशा तऱ्हेच्या विषयावर अद्याप फारशीं पुस्तकें झालेलीं नाहींत. करितां या विषयासंबंधी माहिती एकवटून पद्धतशीर रीतीनें जर मांडिली तर तिचा बराच उपयोग होईल असें वाटल्या वरून हा अल्प प्रयत्न केला आहे. यांत नवीन असें कांहींच केलें नाहीं ह्मटलें तरी चालेल. परंतु यांत एकंदर माहिती नीट रीतीनें समजेल अशी व्यवस्था केली आहे. हल्लीं आपल्या मध्यें जे कपडे वापरण्यांत येतात त्या सर्व कपड्यांच्या कापणीच्या तत्वाची माहिती साधेल तितकी सोप्या भाषेमध्यें व खुलासेवार देण्याचा विचार आहे.

एकंदर विवरणाचे बरेच भाग होतील. त्यांपैकीं हल्लीं पहिला भाग तयार झाला आहे. समजण्यास सोपें जावें ह्मणून विषयाची रचना प्रश्नोत्तर रूपानें सुगम व मनो-रंजक करण्याचा प्रयत्न केला आहे. विषयाच्या स्पष्टी करणा करितां पुस्तकांत जाग जागीं आकृती दिल्या आहेत. या पुस्तकांत कोणास जें कांहीं न्यूनाधिक्य आढळून येईल तें कळविल्यास पुस्तक कर्ता त्याचा फार आभारी होईल. व दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं त्याचा पूर्ण विचार केला जाईल.

ज्या भगवंतानें हें छोटेसें पुस्तक लिहिण्यास प्रोत्साहन दिलें त्याचे चरणीं लीन होऊन ही माझी अल्पशी सेवा लोकादरास पात्र होवो अशी इच्छा प्रदर्शित करून ही प्रस्तावना येथेंच पुरी करितों.

पुस्तककर्ता.

अनुक्रमणिका.

प्रकरण पहिलें.

सदरा (लालची)

रामा०--आज सकाळीं इतके लवकर उठून मी आपले उद्योगास लागलों, तरी पशुपक्षी वगैरे हरएक जीव जंतूंच्या दिन चर्येस सुरवात झालेली आहेच! थोडा संधिप्रकाश पडतांच हौदावर गर्दी व्हावयाची; परंतु आज सामसुम कां? समजत नाहीं. हो! हौदाच्या व फरसीच्या दुरुस्ती संबंधीं काम सुरू व्हावयाचें आहे ह्मणून काल म्युनिसिपालिटिचा शिपाई हौद बंद केला आहे असें पुकारुन गेला, त्या मुळें आज हौदावर गर्दी झालेली नाहीं. हे कामकरी किती सुखी आहेत. आपली रोजमजुरी कमाऊन आपल्या बायका मुलांचा आनंदानें सांभाळ करीत आहेत. माझी स्थिति पहा. निर्वाहाचें साधन नाहीं. शिक्षण मिळविणेची इच्छा आहे परंतु उपयोग काय? येथें आज इतके दिवस राहिल्यामुळें मजला लिहितां वाचतां चांगलें येऊं लागलें आहे, शाळें-तील दिक्षा पुरी होई पर्यंत बरेच दिवस लागतील. तों पर्यंत आपला निर्वाह कसा करावा हा प्रश्नच आहे. आपला मित्र **गोविंदा** गांवांत आला आहे ह्मणून ऐकिलें, व त्या प्रमाणें निरोप ही पाठविला. तो बहुधा लवकरच येईल. आल्यावर त्यास आपला हेतु कळ-विला पाहिजे. हो! गोविंदा आला वाटतें. हो! तोच. **गोविंदा**! आलास, बरें झालें. आतांच तुझी आठवण केली होती.

गोविंदा०-कांबरें! कसें काय? बरें आहेना? आज अगदीं लवकर उठून नित्यकर्म आटपून अभ्यासास बसला आहेस. आज अभ्यास बराच आहेसें दिसतें. अगर कांहीं काम आहे?

रामा०—अरे! अभ्यास कसला! अभ्यासास बसलों परंतु सुचतच नाहीं. कोणतेंही काम करावयाचें असल्यास कामाच्या परिपूर्णतेच्या साधनांची उणीव असतां कार्यसिद्धि होणार नाहीं. असा उपदेश आह्मां सर्वांस शाळेंत वारंवार करीत असतात. मास्तर ह्मणतात "सर्वारंभास्तंदुलाः प्रस्थ मूलाः"

गोविंदा०-असा कां बरें कंटाळलास? तूं हल्लीं शाळेंत आहेसच. असाच अभ्यास पुढें चालीव. ह्मणजे परिक्षेस बसून पास झालेवर निर्वाहाची सोय होईलच. नाहीं बरें? वारंवार उद्योगाची दिशा बदलणें बरें नाहीं. त्यामुळें एकही उद्योग पुरा होत नाहीं. प्रथम आपली दिशा कायम ठरवून त्या मार्गानें जाणेचा यत्न करणें अधिक श्रेयस्कर होईल.

रामा०—शाळेंतील अभ्यासा बद्दल मला कांहीं काळजी नाहीं. तो होईलच. परंतु हल्लीच निर्वाहाचें साधन नसल्यामुळें फिकिरींत आहें. हो! कालची गोष्ट तुला सांगावयाची राहिली. काल शाळेंत आपले गांवचे धनशेट सांवकार आले होते. त्यांचे बरोबर कोणी गृहस्थ

आले होते. त्यांनीं शाळा तपासली व सावकारांनीं माझा नंबर वर आल्यामुळें व माझी स्थिति गरीबीची आहे असें समजल्यामुळें, व माझे आंगांत फाटका सदरा होता असें पाहून मला दोन वार कापड बक्षिस दिलें आणि सांगितलें याचा सदरा शिवून आंगांत घाल. धनवान् उदार मंडळी, गरिब होतकरू लोकांस मदत करितात; ह्मणजे खरोखर ते पुण्य प्राणीच असले पाहिजेत. असो! कापड मिळालें परंतु मज पुढें प्रश्न असा आहे कीं, शिलाई करितां अडीच आणे कोणापाशीं मागावे! शिलाईची थोडीशी माहिती असती तर बाईट बरा सदरा शिवून आंगांत घातला असता. स्वतः माहिती नाहीं. जवळ पैसा नाहीं. मोठी पंचाईत आहे. माझी आई ह्मणे कीं, शाळेंत जाऊन मुलें शिकून हुषार होतात, आपले पोटाला मिळवितात, व आपले आईबापांस मदत करितात. ती बिचारी मरून सुद्धां गेली; तिनें मज करितां फार कष्ट केले. मला येथें शाळेंत ठेवण्या करितां किती खटपट केली ह्मणून सांगू? आज मी सहा वर्षे शाळेंत आहें. मला लिहितां वाचतां चांगलें येऊं लागलें आहे, परंतु त्याचा काय उपयोग?

गोविंदा०—रामा! दारिद्र्या बद्दल तुला वाईट वाटतें तसें वाईट वाटं देऊं नकोस. इष्ट हेतूचे

सिद्धी करितां योग्य तऱ्हेनें व निश्चयानें मेहेनत केली असतां कार्यसिद्धी खचित् होईल. तूं आतां ह्मणालास कीं, मला सदरा शिवतां आला असता तर बरें झालें असतें. तुला जर तशी इच्छा असेल तर उद्यां आदितवारीं सुटींत मला दुपारीं भेट ह्मणजे पाहूं.


रामा०–गोविंदा! तर मग तुझे मजवर उपकार होतील; पण तुजपाशीं शिंप्याकडे यंत्र असतें, तसें यंत्र आहे काय?

गोविंदा०–यंत्र कशाला पाहिजे. कपडे हातीं शिवतां येत नाहींत काय? ज्यांना ऐपत नाहीं त्यांनीं त्यांच्यापाशीं जीं साधनें असतील त्यांचाच उपयोग करावा. आदितवारीं नुसता ये, मग पाहूं काय काय पाहिजे तें. तूर्त तुला एकच सदरा शिवावयाचा आहे, त्याचाच विचार! आतांच धंदा सुरू करण्याचा नाहीं ना? तसें असेल तर तो धंदा शिकण्यास साधनें काय काय पाहिजेत त्याचा विचार करावयाचा.

रामा०–गोविंदा! तूं ह्मणाला होतास कीं, तुझ्या मनांत असेल तर तुला सदरा शिवण्यास शिकवीन. मी आपला जुना सदरा तूं सांगितल्या प्रमाणें आणिला आहे.

गोविंदा०–बरं! तुला तोंडीं सांगण्या पेक्षां तुझे हातूनच काम करवून घेतों. तुझा सदरा जमिनीवर

हांतर पाहूं! प्रथम सदऱ्याच्या पाठीकडील भाग वर करून जमिनीवर हांतर; आणि पहा. गळ्याला लागून चौकानीं पण लांबट भाग मध्य भागीं दिसतो त्यास




पिछा म्हणतात. पिछास लागून हाताचे खालीं लांबट व एका बाजूस तिरपा भाग आहे त्यास कळी म्हणतात. पिछाचे दोन्ही बाजूस दोन हात आहेत. हात व कळ्या यांस लागून एक तिकोनी भाग दिसतो ती बगॅल आणि पिछाचे वरचे बाजूस अरुंद दुहेरी पट्टी जोडलेली दिसते तीस गळेपट्टी म्हणतात. पिछाची खालची बाजू व कळ्यांची खालची बाजू येथील सुतें निघून जाऊं नयेत म्हणून दुमडून शिव लेली आहे. पिछास गळेपट्टी ज्या ठिकाणीं जोडलेली आहे तेथें पिछाचा भाग सरळ दिसत नसून त्यास जरा बांक दिसत आहे. पिछा पैकीं चार पासून पांच

इंच भाग गळपट्टींत गुंतलेला आहे. सदरा लहान अगर मोठा असेल त्या मानानें कमी जास्त भाग गळेपट्टींत शिवला जातो. आतां हे भाग एकमेकांशीं कसे जोडलेले आहेत तिकडे लक्ष दे. पिछाची दोन्ही बाजूंची शिवण पहा. ती वरून असें दिसून येतें कीं, पिछाची दोन्ही बाजूंची कड दुमडून हाताचे माथ्या पासून खालीं व कळीचे उभे भागावर (तिरपे भागावर) बसवून शिवलेली दिसते. तसेंच कळीचे माथ्यावर व बगलेचे एके बाजूवर हाताच्या माथ्या जवळील बाजूचा भाग दुमडून बसवून शिवलेला दिसतो. तसेंच कळीचे माथ्या जवळील तिची थोडीशी उभीकड बगलेवर दुमडून शिवलेली आहे ह्मणजे बगलेचे चार बाजू पैकीं दोन बाजू सदऱ्याच्या पाटीमागील भागा पैकीं कळी व हात यात गुंतलेल्या आहेत.

रामा०—अंधारांत असलेल्या मनुष्यास दिवा दाखवितांच जसें सभोंवतालच्या वस्तूंचें ज्ञान होतें त्याच प्रमाणें तुझ्या ह्या माहितीनें मजला नवी दृष्टि आली. आतां याच प्रमाणें सदऱ्याचे पुढील भागा बद्दल माहिती सांग पाहूं.

गोविंदा०—रामा! मला कांहीं फारशी माहिती नाहीं फक्त तुला दिशा दाखवितों. ह्या वरून मेहनतीनें तूंच माहिती मिळवूं शकशील. आतां सदरा उलटा कर

पाहूं ह्मणजे पुढील भाग वर दिसूं लागेल. **मागील** (**पिछाचे**) भागामध्यें व पुढील भागामध्यें विशेष फरक नाहीं. दोन्ही सारख्याच मापांचे आहेत. मागील भाग **पुढील** भागाशीं (**पिछा आग्याशीं**) जेथें सांधलेला आहे तें **आंढें**. सदऱ्याचे पुढील मध्य भागास **आंगा** ह्मणतात. **पिछाची** उभी बाजू जशी **बाही** व **कळीस** जोडलेली असते, त्या प्रमाणेंच **आग्याची** उभी बाजू सदऱ्याच्या पुढील भागाच्या **बाहीशीं** (हाताचे माथ्याशीं) व कळीशीं जोडलेली आहे. पिछाचे बाजू प्रमाणें **आग्याची** उभी बाजू दुमडून बाहींवर (बाहीचे माथ्याचे अर्धे भागावर) व कळीवर शिवून बसविलेली दिसते. व बाहीची बाजू कळीचे माथ्यावर व बगलेवर दुमडून शिवून बसविलेली दिसत



आहे व बाहीच्या बाजूची त्या पुढील शिवण बाहीचे **मोहळी** (शेवटां) पर्यंत आंतून घातलेली दिसते. बाहीचे शेवटीं (मोह

वीशीं) थोडीशी बाजू आंत दुमडून शिवलीं आहे. कांहीं सदऱ्यांस बाहीचे शेवटीं निराळ्या विशेष तऱ्हेच्या पट्ट्या जोडलेल्या दिसतात त्यांस **कफ** ह्मणतात.

कफ करण्याचा उद्देश असा दिसतो कीं, कफाचीं बटनें लाविलीं ह्मणजे बाहीची मोहळी लोंबू नये व कफ मनगटाशीं बसला रहावा. आग्याचे मध्य भागीं गळ्या पासून खालीं एक पट्टी आंत बटणें अडकवलेली दिसते, ती **काजेपट्टी**. हिच्याच खालीं ज्या पट्टीस बटणें शिवलेलीं दिसतात तीस **बटनपट्टी (गुंडेपट्टी)** ह्मणतात. पिछास ज्या गळेपट्टीचा भाग शिवलेला दिसतो तिचेंच एक टोंक आग्यावर उजवे बाजूस बसवून बटन पट्टीचें माथ्या पर्यंत शिवलेलें असतें व दुसरें टोंक आग्यावरिल डावे बाजूस काजे पट्टीचे माथ्यावर बसवितात. ह्मणजे गळेपट्टी पुरी होते. गळेपट्टी दुहेरी असते. कधीं कधीं ही गळेपट्टी व काजेपट्टी या विशेष तऱ्हेनें ताठ रहाव्या ह्मणून आंत आवडी प्रमाणें जाड अगर पातळ कापडाची भर देतात. काजेपट्टी आग्याचे मध्य रेषेचे डावे बाजूस दुहेरी जोडलेली असते व बटण पट्टी उजवे बाजूस काजेपट्टीचे खालीं बसली जाईल अशी एकेरीच जोडतात. काजे पट्टीचें खालचें टोंक तिकोनी अगर चौकोनी असें आग्यावर बसवून शिवतात. बटण पट्टीस बटणें टांचतात व

काजें पट्टीस बटणें शिरतील अशीं भोकें पाडून तीं विशेष प्रकारच्या शिवणीनें शिवतात, ह्मणजे काजा चांगला टिकतो, सुतें निघत नाहींत. आग्यावर काजे पट्टीच्या शेवटा जवळ डावे बाजूस घड्याळाचा खिसा लावितात. व आग्यावर मध्य भागीं पण जरा उजवे बाजूस एक खिसा बसवितात. कांहीं सदऱ्यांस आवडी प्रमाणें कळ्यांचे जोड शिवणींमध्यें आंतले बाजूस खिसा बसवून कळ्यांचे जोड शिवणींत खिशाचें तोंड करितात.

रामा०-गोविंदा! आतां ह्या भागांचे तुकडे कसे करावयाचे ती माहिती सांग पाहूं? हें घे कापड.

गोविंदा०-रामा! तुला आतां सदऱ्याच्या निरनिराळ्या भागांची बहुतेक माहिती झाली या प्रमाणें कापडाचे तुकडे करितां येतील किंवा नाहींत?

रामा०-हो! तुकडे करितां येतील व तसे तुकडे करून ते याच सदऱ्याचे धोरणानें शिवून जोडले ह्मणजे सदरा तयार होईल. परंतु या पेक्षां मोठा अगर लहान सदरा शिवण्याचा असल्यास याच प्रमाणें भाग कापून ते भाग जोडले असतां त्या त्या प्रमाणाचा मोठा अगर लहान सदरा तयार होईल. नाहीं बरें?

गोविंदा०—तुझी कल्पना बरोबर आहे परंतु तूं ह्मणतोस त्याच प्रमाणें केलें असतां एक मोठी अडचण येणार आहे. पहा या हांतरलेल्या सदऱ्याचे भागां प्रमाणें तुकडे नवीन कापडाचे केले, व शिवून जोडले तर प्रत्येक भागाच्या कडेशीं ह्मणजे जी कड शिवणींत गुंतली जाणार त्या कडेशीं त्या भागाची थोडीशी बाजू (माया) मूळ भागांत कमी होणार नाहीं बरें? ह्मणजे दोन तुकडे (भाग) एके ठिकाणीं शिवून जोडल्यावर शिवणींत जेवढा भाग प्रत्येक तुकड्याचा गुंतेल तेवढा भाग कमी होणार व यामुळें कपडा ज्या प्रमाणाचा कापला गेला असेल त्या प्रमाणांत शिलाईंत कांहीं भाग अडून गेल्यामुळें कमीपणा येईल व यामुळें कपडा घट्ट होईल कीं नाहीं? ह्मणून शिलाईचा हक्क लक्षांत ठेवून मग तुकडे पाडावे.

तुझा दुसरा प्रश्न असा आहे कीं, याच प्रमाणें लहान अगर मोठ्या मनुष्याच्या कपड्याचे तुकडे पाडून जोडले तर त्या त्या मनुष्याचा कपडा बनेल किंवा नाहीं? यास उत्तर होय. परंतु सर्व मनुष्यांचे सर्व अवयव सारखे प्रमाणाचे नसतात. कोणी लठ्ठ असतो तर कोणी किरकोळ असतो; कोणाचा हात लांब असतो तर कोणाचा तोकडा असतो. ह्मणजे ज्या मनुष्याचे छातीचा घेर

छत्तीस इंच आहे त्याचे हाताचे लांबीचे मानानें जर बावीस इंच हाताची लांबी (बाही) लागली, तर ज्याचा कोठा चव्वतीस इंच आहे त्यास बाहीची लांबी याच प्रमाणानें कमी लागेल असें नाहीं. कदाचित् ज्यास्त लांब लागेल किंवा ज्यास्त तोकडी लागेल. याच प्रमाणें प्रत्येक अवयवाचें होणार आहे. परंतु हें सर्व साधारण प्रमाण खरें आहे कीं मनुष्याचा बांधा जर साधारण प्रमाणाचा असेल तर त्या त्या मानानें कमी जास्त प्रमाणानें कपडा बेताचाच ह्मणजे त्या त्या प्रमाणाचाच होईल.

रामा०—कित्येक सदऱ्यांस बटण पट्टी व काजेपट्टी न लावितां बंद लावितात अगर गुळखें करितात तें काय?

गोविंदा०—हो! बरी आठवण केलीस. काजेपट्टी व बटणपट्टी लावण्या करितां जसें आग्ग्याचे मध्य भागीं गळया खालीं उभें चिरितात तसेंच आवडी प्रमाणें कित्येक सदऱ्यांस उजवे बाजूस आडें व गळ्याचा वर्तुळ भाग ज्या ठिकाणीं मिळतो त्या ठिकाणा पासून खालीं आग्यावर उभा भाग चिरून, त्या चिरलेल्या भागाचे कडेस आंतून पट्टी लावून वर गळ्याशीं आग्याचे गळ्याचे टोंकास गुंडी लावून आढ्याचे शिवणींत गुंडी बसविणेस बिरडें लावितात.

मुसलमानी लोकांचे अशाच प्रकारचे सदऱ्यांस (लालची) गुंडी बिरडें उजवे बाजूस चिरून न

बसवितां, डावे बाजूस बसविणेची पद्धत आहे. कित्येक सदऱ्यांस आग्याचा भाग मध्यभागीं अगर उजवे बाजूस न चिरतां आढ्याचे शिवणींतच सुमारें तीन चार इंच भाग सुटा ठेवून बंद लावण्याची प्रघात आहे.

कोणताही कपडा पहा त्यांत कपडा वापरणारांचीं आवड, समुदायाची सर्व साधारण वागणूक यांचें थोडें बहुत चित्र कपड्यातहि दिसतें. परंतु कपडा वापरण्याचा मुख्य हेतु ह्मणजे ऋतु माना प्रमाणें शीतोष्णादिकांचा परिणाम शरिरावर सुखावह व्हावा हा होय. रामा! तुला आतां सदऱ्या संबंधानें तो शिवावा कसा व त्याचे निरनिराळे भाग जोडावे कसे हें साधारण समजलें असेलच. आतां आंगाचे मापांप्रमाणें कापडाचे तुकडे करून सदरा शिवतां येईल किंवा नाहीं?

रामा०–तूं सांगितल्या प्रमाणें सर्व समजलें. परंतु आतां पर्यंत तूं जें सांगीतलेंस त्या वरून कपडा तयार करण्याचें जें खरें तत्व कीं, ज्या पासून पाहिजें त्या प्रमाणाचा कपडा कापून शिवतां येईल, तें कांहीं सांगितलें नाहींस. तें तत्व ह्मणजे मापांची माहिती ती समजल्या शिवाय ही सर्व माहिती रोगी मनुष्यास औषध योजना करून औषध देण्याचे ऐवजी बरा होण्याचे नुसते उपाय सुचविण्या प्रमाणें होणार आहे.

गोविंदा०– तूं ह्मणतोस तें खरें. तुला शिवण कामा संबंधानें मुळींच माहिती नव्हती. सदरा कशाला ह्मण-

तात, सदऱ्याचे निरनिराळे भाग कसकसे असतात, ते कसकसे जोडतात वगैरे माहिती पूर्वी नसून जर त्याच्या मापांची माहिती तुला सांगितली असती तर तुला कांहींच समजलें नसतें. ही माहिती समजल्या नंतर त्या मापांची माहिती समजणें बरें नाहीं काय ?

रामा॰–हो बरोबर ह्मणतोस सदऱ्याचें काय ? किंवा कोणतेहि कपड्याचें काय ? निरनिराळे भागांचीं नांवें हीं पारिभाषिक ह्मणजे ठरीव असल्यामुळें त्या त्या पारिभाषिक शब्दांचें ज्ञान असलेंच पाहिजे. जसें:– **कोठा, बाही, कळी, गळेपट्टी, काजेपट्टी, गुंडेपट्टी,** अगर **बटणपट्टी, बगल, आगा,** पिछा, वगैरे. कायरे **गोविंदा! मुंढेछाटी** ह्मणून एक सदऱ्याचा प्रकार आहे तो काय ?

गोविंदा॰–होय. बरी आठवण केलीस. तो प्रकार तुला सांगण्याचा राहिला. **मुंढेछाटी** व **चौबगली** असे सदऱ्याचे मुख्य दोन प्रकार आहेत. **बगल** ह्मणजे काय हें तुला माहित आहेच. ज्या सदऱ्याची बगल **चौकोनी** असते त्यास **चौबगली सदरा** ह्मणतात व ज्याची बगल **तिकोनी** असते त्यास **मुंढ छाटी सदरा** ह्मणतात. ह्या तिकोनी बगलेच्या दोन बाजू बाहीस जोडतात व बगलेची तिसरी बाजू बाहीच्या माथ्यासह कळ्यांचे माथ्यावर आणि आगा व पिछाचे बाजूवर बसवून शिवली जाते. **(आकृती अकरा पहा)** ही बगल कळ्यांचे माथ्यावर बसविण्याची असते ह्मणून चौबगली सदऱ्याचे कळ्यांचे माथ्याशीं जितकी रुंदी

असते ती पेक्षां जास्त रुंदीचा माथा ठेवावा लागतो.

एकंदर निरनिराळे प्रकारचे सदरे पाहिले तरी त्यांची बेतण्याची पद्धत व निरनिराळे भाग हे बहुतेक एक सारखेच असतात.

रामा०–आतां मला सुद्धां वाटतें कीं, सदऱ्या संबंधीं सर्व माहिती मापां शिवाय बहुतेक पुरी झाली. आतां मापांचीच काय ती माहिती होणें राहिली.

गोविंदा०–छाती सभोंवतीं जे कपडे पेहेरावयाचे असतात त्यांचें मुख्य माप ह्मणजे त्या मनुष्याच्या कोठ्याचें माप हें होय. कोठ्याचें माप घेणें तें खांके खालून पाठीचे खुब्या वरून व छाती वरून माप घ्यावें. यास कोठ्याचें माप ह्मणतात. आगा पिछा यांची रुंदी कोठ्याचे निम्मे व उंची वापरणाराचे मर्जी प्रमाणें



घ्यावी. पिछाचे तुकड्याची उभी दुघडी करून (अ ब) दुमडीवर (अ ड) असें अर्ध इंच अंतर घ्यावें व (अ क) अडीच इंच ह्मणजे गळ्याचे घेराचे ⅙ अंतर घ्यावें आणि (क ड) अशा वांकानें कापावें. असा काप घेणें तो प्रथम न घेतां गळेपट्टी लावितांना जशी अवश्यकता दिसेल तसें कापावें. पिछाचे तुकड्यांत गळ्याचे

या छाटा शिवाय दुसरें कांहीं करावयाचें नसतें.

तुला आतां जीं मापें सांगणार आहें तीं ज्या मनुष्याचा कोठा **छात्तिस** इंच आहे अशा मनुष्याचीं मापें **इंचांत** सांगून शिवाय कोठ्याचें **अर्ध** हें प्रमाण कल्पून त्याचे अमुक अंश अशा पद्धतीनें सांगणार आहें; ह्मणजे लहान मोठे प्रमाणाचा कपडा कापणेस त्या अंशांचा (हिशांचा) उपयोग होईल.


आग्या करितां तुकडा घेणें तो पिछा येवढाच घ्यावयाचा याची उभी दुघडी करून जमिनीवर हांतर पाहूं.



(अ ब) ही दुमड. ही छातीवर मधोमध येईल. गळ्याचे छाटा करितां आढ्यावर (अ ड) अडीच इंच ह्मणजे गळ्याचे घेराचे (१/६) अंतर घ्यावें, व (अ क) असें छातीवर **तीन** अगर **सवा तीन** ह्मणजे गळ्याचे घेराचे (१/४) यांत अर्धा पाउण इंच कमी घ्यावें. (क ड) असा गळ्याला बांकदार छाट घ्यावा.

काजेपट्टी व बटण पट्टी म्हणजे काय तें तुला माहित आहेच. ती काजेपट्टी लावण्या करितां आग्याचे मध्य भागीं

काजेपट्टी आग्यावर बरोबर मध्यावर बसावी ह्मणून उभें चिरावें लागतें. दुमडीचे ह्मणजे मध्य रेषेचे डावे बाजूस सुमारें अर्ध इंच अंतरावर आगा सात आठ इंच उभा चिरावा. डावे बाजूस सुमारें दीड अगर दोन इंच रुंदीची दुहेरी पट्टी (काजेपट्टी) जोडावी व उजवे बाजूस एक अगर सवाइंच रुंदीची गुंढे पट्टी (बटण पट्टी) एकेरी आंतून जोडावी बटनपट्टी व काजेपट्टी ह्या दोन्ही जोडल्या नंतर गळ्यास पुरेल इतकी लांब व सवा अगर दीड इंच रुंदीची दुहेरी गळेपट्टी गळ्यास जोडावी. ही गळेपट्टी नुसती न जोडतां



आकृतींत दाखविल्या प्रमाणें बांकाची असल्यास चांगली बसते. (आकृती पांच आणि सहा पहा) चिरलेला भाग छातीवर मधोमध नको असल्यास उजवे बाजूस गळ्याचे कोंप ऱ्यापासून उभें सात आठ इंच चिरून त्यास काजेपट्टी व गुंढेपट्टी अगर आंतून नुसती अर्ध पाऊण इंच रुंदीची साधी पट्टी लावून शेवटाशीं गुंढी बिडरें लावावें अगर कोणी कोणी बंद लावितात. तसेंच छातीवर उभें न चिरतां आड्यावर सुमारें तीन इंच शिवण मोकळी ठेवून


बंद लावण्याचा प्रघात आहे. म्हणून मागें तुला सांगितलेंच आहे. गुंडी बिरडें अगर बंद लावावयाचे असल्यास गळेपट्टी लावण्याची नसते. आग्याचा भाग छातीवर उभा चिरावा लागतो तो असे प्रमाणानें असावा कीं, त्यामुळें सदरा घालतांना अगर काढितांना डोकयास नडूं नये. आगा व पिछा यांचे तुकडे निरनिराळे न घेतां एकच तुकडा घेऊन त्यांत आगा पिछा हे बसवितां येतात. कोठ्याचे अर्धा इतकें रुंद व सदऱ्याच्या उंचीच्या दुप्पट लांब तुकडा घेऊन आढ्याचे जागीं न कापितां आग्यावर गळ्याचा छाट घेतां येतो.

बाही करितां जें माप घेणें तें गळ्या पासून खांद्या



वरून मनगटां पर्यंत अगर वापरणाराचे मर्जी प्रमाणें थोडें कमी अगर जास्ती घ्यावें. त्यांत आढ्याची लांबी वजा करून बाकी इतका लांब व पंधरा इंच (कोठ्याचे अर्धाचे $\frac{५}{६}$) रुंद असा तुकडा घेऊन मनगटाशीं बारा इंच ह्मणजे($\frac{२}{३}$) रुंद असा ठेवावा. हातास कफ (मनगटपट्टी) लावावयाचे असल्यास कफाची रुंदी बाहीच्या लांबींत वजा करावी व बाहीची रुंदी सोळा अगर सतरा ह्मणजे कोठ्याचे अर्धा पेक्षां इंच दीड इंच कमी घ्यावी.

कळी करितां कापड घेणें तें, सदऱ्याचे उंचींत बाहीची निम्मे रुंदी वजा, इतकें लांब व नऊ दहा



इंच (आग्याचे रुंदीचे निम्मे पेक्षां एक इंच जास्त) रुंदीचा तुकडा घेऊन माथ्याशीं दोन इंच (कोळ्याचे अर्धाचे १/८) व बुंधाशीं सात आठ इंच (कोळ्याचे अर्धाचे ४/८) असे दोन तुकडे करावे. हे दोन तुकडे माथ्याकडील बाजूशीं एके ठिकाणीं जोडलें ह्मणजे सदऱ्याची एके बाजूची एक कळी होते. अशा दोन दोन तुकड्यांची एक कळी न करितां एकेच तुकड्याची राखितां येते. अशा दोन कळ्या प्रत्येक सदऱ्यास लागतात.

या प्रत्येक कळीस चौबगली सदऱ्यास एक



आ. ९

एक बगल लावितात. ही बगल पांच साडेपांच इंच (१/३ पेक्षां इंच अर्धा इंच कमी) लांबी रुंदीची चौरस असावी. ह्या बगलेच्या दोन बाजू कळीच्या माथ्याशीं कळीस उभ्या भागांत जोडीतात. (आकृती ९ पहा) बगल



कळीस जोडलेली दाखविली आहे.

मुंढेछाटी सदऱ्याच्या कळीचा माथा या कळीच्या माथ्यापेक्षां अर्धे पाऊण इंच रुंद ठेवितात व कळीचे तिरपे बाजूचे माथ्याकडील कोंपऱ्या पासून (दहावे आकृतींत अ पहा) कळीचे सरळ उंचीवर खालीं दोन इंच उतरता छाट देतात.



मुंढ्याचे घेरांत बाहीची रुंदी वजा जातां बाकी इतकी रुंद अशी तिकोनी बगलेची एक बाजू ठेवून दुसऱ्या दोन बाजू तीन पासून चार इंच लांबीच्या ठेवाव्या. ही बगल बाहीस जोडण्याच्या पूर्वीं बाहीच्या माथ्यास जरा गोल छाट देतात (आकृती ११ पहा).



मनगटपट्टी ह्मणजे कफ या करितां नऊ इंच किंवा कोप्याचे अर्धाचे निम्मे लांब व तीन इंच किंवा (१/२) रुंद अशी दुहेरी

पट्टी घेऊन तिचीं दोन टोकें जरा गोल (अगर मर्जी प्रमाणें काट कोनांत) करावीं (आकृती १२ पहा). या पट्टीमध्यें बाहीच्या मोहळी कडील भाग चूण करून बसवून शिवावा.

रामा०—गोविंदा. या सर्व माहिती वरून सदरा शिवतां येईल असें वाटतें परंतु प्रत्यक्ष काम करावयास लागलों तर बऱ्य च अडचणी येतील.

गोविंदा०—ही सदऱ्या संबंधीं माहिती सांगितली तरी प्रत्यक्ष काम करूं लागलास ह्मणजे पुष्कळ अड-चणी येतील. त्या अडचणी जेव्हां येतील त्या वेळीं अनुभवी मनुष्या पासून माहिती करून ध्यावी कोण-त्याहि धंद्याच्या माहितीचीं पुस्तकेंच केवळ वाचून तो धंदा करितां येणार नाहीं, ती माहिती फक्त मार्ग दर्शक होईल.

प्रकरण दुसरें.

बाराबंदी (बन्यान)

रामा०— सदऱ्याची जशी माहिती सांगितलीस तशी बन्यानाची सांग पाहूं ?

गोविंदा०—बाराबंदी अगर बन्यान हा कपडा छातीसभोंवतीं पेहेरावयाच्या कपड्यां पैकीं असून त्यास बारा अगर दहा बंद लावितात, ह्मणून त्यास बाराबंदी ह्मणण्याचा प्रघात आहे. सदऱ्याच्या निरनिराळ्या भागांची माहिती जशी तुला सांगितली तशी बन्यानाचे निरनिराळ्या भागांची माहिती तुला प्रथम सांगू काय ? अगर मापांचीच एकदम सांगू.

रामा०—छे ! मापांची माहिती फक्त असली ह्मणजे काम झालें अशी माझी समजूत आतां पूर्वी प्रमाणें राहिली नाहीं. कपड्याचे निरनिराळे भागांची माहिती प्रथम असून त्याची शिलाई कसकशी असते व प्रत्येक भागा पैकीं किती हक्क (माया) शिलाईत शिवला जातो (गुंतला जातो) वगैरे माहिती प्रथम असलीच पाहिजे; त्या शिवाय मापांचे माहितीचा मुळींच उपयोग होणार नाहीं असें मला वाटतें. नाहीं बरें गोविंदा ?

गोविंदा०— बरोबर बोललास. या कामीं तुझी समजूत चांगली झालेली दिसते. बन्यानाचे कसकसे भाग आहेत ते तुला समजतील तसे सांग पाहूं.

रामा०-बन्यानाला गळ्या सभोंवतीं लांबच्या अंग एक पासून दीड इंच रुंदीची अशी गळेपट्टी असते व हिच्या शेवटाशीं बंद असतात. सदऱ्या प्रमाणें बन्यानास आगा व पिछा असे निराळे भाग नसतात. पाठीचा व पोटाचा असा एकच भाग असतो. शिवाय पोटावर पडद्या सारखा दुहेरी भाग येतो व या पडद्यांत कडेला उभ्या बाजूवर बाहेरील पडद्यास तीन व आंतील पडद्यास तीन अगर दोन बंद असतात व या बंदांस बांधण्यास यांचेच समोर डावे खांके खालीं उभे रेषेंत, जितके बंद पुढील (वरील) पडद्यास असतात, तितकेच त्या त्या बंदांच्या समोर येतील असे लाविलेले आहेत. तुमच्या भाऊंच्या आंगांत बन्यान आहे त्याचे हातास खांके खालीं एक तिकोनी बगल आहे ही बगल मुंढेछाटी सदऱ्यास जशी तिकोनी बगल असते ह्मणून तूं सांगितलेंस तशी दिसली.

गोविंदा०-होय. बरोबर सांगितलेंस छाती सभोंवतीं पेहेरावयाचे प्रत्येक कपड्यांत पाठीवरील भाग ह्मणजे पिछा व पुढील भाग (छातीवरील भाग) ह्मणजे आगा असे कल्पितां येतात. बाराबंदींत आगा दुहेरी असतो ह्मणजे डावे बाजू कडून जो भाग (पडदा) येतो त्यावर उजवे कडील पडदा बांधावयाचा असतो;

उजवे कडील पडद्यावर ह्मणजे बाहेरील पडद्यावर खिसा लावलेला असतो, तो सदऱ्याच्या खिशा पेक्षां निराळ्या प्रकारचा असतो; ह्मणजे तो पुढील पदरावर (पड-द्यावर) सदऱ्या प्रमाणें निराळा तुकडा न शिवतां पुढील पडद्याचा भाग आडवा चिरून त्यांत एक पिशवी शिवतात. ही पिशवी त्या कापामध्यें (चिरेमध्यें) कशी शिवलेली आहे, तें नीट लक्ष पूर्वक पहा. पिश-वीच्या तोंडाच्या दोन बाजूं पैकीं एक बाजू ह्या कापाचे (चिरेच्या) वरील कडेस शिवून दुसरी बाजू खालील कडेस शिवतात, व ह्या शिवणी बाहेर दिसूं नयेत ह्मणून एक इंच पाऊण इंच रुंदीची पट्टी खिशाच्या तोंडाच्या खालील बाजूवर बसवून शिवतात. बन्यानाची पुढील बाजू (आगा) व पाठ (पिछा) यांचे मिलाफाचे जागीं ह्मणजे खांके खालीं समोर आगा व पिछा यांचे संधीवर खालचे बाजूस सुमारें तीन चार इंच कड चिरून तीच दुमडून शिवलेली आहे. सदहू ठिकाणीं चिरून कडा दुमडून शिवतात. तें ठिकाण कण्या पासून ह्मणजे पाठीचे मध्य रेषेपासून दोन्ही कुशींवर नऊ इंच ($\frac{१}{२}$) अंतरावर असतें. सदऱ्याचे पिछाचे गळ्यास जसा थोडासा वर्तुळ छाट दिसतो तसेंच बन्यानाचे पिछासहि गळ्याचा छाट देतात. शिवाय आग्याचे पडद्याचे वरील कोंपरे तिरपे छाटून त्या छाटां वरून गळेपट्टी शिवून बसविलेली असते. बन्यानास

मुंढेछाटी सद्ऱ्या प्रमाणेंच तिकोनी बगल असते. सदऱ्या प्रमाणेंच बाहीची मोहोळी इंच दोन इंच आंत दुमडून शिवलेली असते. अगर मोहोळीशीं कापडाची कड आणितात. तसेंच पडद्याचे उभे बाजूस जेथें बंद लावितात तेथेंही कापडाची कड आणितात. ह्मणजे सुतें निघं नयेत ह्मणून कड दुमडून शिवावयाचें कारण पडत नाहीं.


या शिवाय कांहीं विशेष सांगण्या सारखें राहिलें नाहीं. बारावंदी प्रमाणेंच दुहेरी गुंड्याची बंडी असते तीस बंद न लावितां गुंड्या लावितात. बन्यानांत व या गुंड्यांच्या बंडींत कांहीं विशेष फरक नाहीं. फक्त बंदां ऐवजीं गुंड्या लावितात. व यामुळें थोडा फरक करावा लागतो. यास गळेपट्टी न लावितां गळा मुंडाच ठेवितात. बन्याना प्रमाणें आग्याचे पडद्यांचे वरील कोंपरे तिरपे न छाटतां सदऱ्याप्रमाणेंच गळ्याचा छाट घ्यावा लागतो. ही माहिती पुढें मापांचे माहिती बरोबर तुला चांगली समजेल अशी सांगेन.

बन्याना करितां मापें घेणें तीं:– (१) कोठ्याचें माप घ्यावें; तसेंच (२) उंची (साधारण मान ढुंगणाचे वरचे भागापर्यंत); (३) बाही (सदऱ्याचें बाहीचे मापा प्रमाण); अशीं मापें घ्यावीं.

सदऱ्या प्रमाणें बन्यान कापितांना आगा व पिछा यांचे निरनिराळेही भाग कापितां येतात. तुला जी

कापणी सांगणार आहे त्यांत पाठीच्या कण्याच्या मध्य रेषेच्या ह्मणजे कण्याचे रेषेच्या आधारानें मापें सांगणार आहे. कोठ्याचे सवापट व कपडा जसा लहानाचा अगर मोठ्याचा असेल त्या मानानें एक पासून चार इंच जास्त इतके रुंदीचा व वापरणाराचे मर्जी प्रमाणें जितके उंचीचा कपडा करणें असेल तितके उंची इतका लांब असा कापडाचा तुकडा घ्यावा (कपडा शिवतांनां कापडाचा उभा धागा (ताणा) साधेल तर उंचीवर घ्यावा) या तुकड्याची उभी दुघडी करावी. या दुघडीचे दोन बाजूस शेवटीं कापडाचा कांठ आणितां आल्यास बरा.

आतां आकृती कडे लक्ष दे. या दुघडीची दुमड (अ ब) करडा आंगांत घातला ह्मणजे पाठीचे कण्या-



आ. न. १३.

वर येईल. नाहीं बरें? मुंढ्याकरितां जीं मापें सांगणार आहें तीं कण्याचे आधारानें ह्मणजे कण्याचे उभे रेषेवर काटकोनांत रेषा काढून त्यावरून मापें सांगणार

आहे. सदऱ्या प्रमाणेंच गळ्या खालीं कण्याचे आधार रेषेवर अ पासून अर्धा इंच अंतर घेऊन ड येथें खूण कर. आळ्याचा माने जवळचा बिंदु मिळण्या करितां (अ क) तीन इंच ($\frac{१}{६}$) अंतर घ्यावें. म्हणजे (ड क) हा गळ्याचा पाठीवरील छाट झाला. मुंढ्याचा छाट कसा घेणें तो समजण्याकरितां कण्याचे (अ ब) रेघे वर (अ ग) दोन इंच (किंवा मुख्य प्रमाणाचे म्हणजे कोठ्याचे अर्धाचे ($\frac{१}{२}$) अ इ साडेसात इंच ($\frac{५}{१२}$), व अ फ नऊ इंच ($\frac{१}{२}$), अशा खुणा कर; व ग इ आणि फ पासून काटकोनांत ग द; इ ट; फ ल अशा रेघा काढाव्या. ग द साडेआठ इंच ($\frac{१}{२}$ यांत अर्धा इंच कमी); इ ट साडेसात इंच ($\frac{५}{१२}$); फ म बारा इंच ($\frac{१}{३}$); म पासून मत असा लंब काढावा. मप एक इंच; तन एक इंच न पासून नर काट कोनांत रेघ काढावी. द ट प र असा मुंढ्याचा छाट घ्यावा. क द हा पिछाचे भागापैकीं आळ्याचा छाट. आग्याचे भागाचे आळ्याकरितां अ य पंधरा इंच ($\frac{५}{६}$) अंतर घ्यावें. क द इतकें अंतर म्हणजे पिछाचे आळ्या इतकें य र असें अंतर घ्यावें. फ म रेघ पुढें ल पर्यंत वाढवावी. य ल हा गळ्याचा छाट. बंदांच्या जागा शून्यांनीं दाखविल्या आहेत त्या पहा. खांके खालीं समोर व येथें तीन चार इंच चिरावें.


गळेपट्टी एक दीड इंच रुंदीची व गळ्यास पुरेल इतकी लांब अशी एक दुहेरी पट्टी लावितात व या गळे पट्टीच्या शेवटास बंद टांचितात.

बन्यानास बाही लावितात, ती मुंढेछाटी सदऱ्या प्रमाणें लावितात (आकृती ११ पहा) बाहींचे एकं- दर घेतलेले मापांत आळ्याची लांबी वजा करून बाकी इतका लांब व पंधरा इंच ($\frac{५}{६}$) रुंदीचा तुकडा घेऊन माथ्यास कोंपऱ्याशीं जरा गोल छाट घ्यावा व मोहळी- शीं (शेवटाशीं) दहा अकरा इंच ($\frac{-}{६}$) रुंदी ठेवावी. (आकृती ११ पहा). अशा दोन बाह्या बन्यानास अस- तात. मुंढ्याचे छाटांत बाहीची रुंदी वजा करून बाकी इतकी बगलेची एक बाजू ठेवून दुसऱ्या दोन बाजू तीन चार इंच ठेवाऱ्या.

रामा०— एखाद्या मनुष्याचें पोट छाती पेक्षां फार मोठें असेल तर बन्यानाचा घेर पोटास पुरणार नाहीं; त्या करितां काय तजवीज करितां येते?


गोविंदा०—कोठ्या करितां जितकें कापड घ्यावयाचें त्या पेक्षां पोटाचे घेरास जितकें जास्त लागेल तितकें घ्यावें. जास्त घेतलेल्या कापडाचा भाग मधोमध येईल असे रीतीनें गळ्यापासून पोटापर्यंत उभें चिरून डांच घेतात व छातीवरील जास्त कापडाचा भाग काढून टाकितात.


(आकृती १४ पहा) पोटाचा घेर कोळ्यापेक्षां जितका जास्त असेल तितक्याच रुंदीचा (ह न पहा) डांच काढून टाकिला पाहिजे.



आकृतींत दाखविल्याप्रमाणें चिरून हसन असा डांच घ्यावा. व हस व नस ह्या बाजू शिवून जोडाव्या आणि फाजील तुकडा कापून टाकावा.

वर सांगितल्याप्रमाणें, ह्मणजे कोळ्याचे मानानें जें कापड घ्यावयाचें त्या शिवाय पोटाकरितां जास्त लागणारें कापड न घेतां पोटावर, पोटाचे घेराचे मानानें जितकें कापड जास्त लागण्याचा संभव असेल त्या मानानें पोटावरचा भाग चिरून कळी भरून द्यावी ह्मणजे कोळ्याचे मापाचे कापडांत कळीची भर पडून पोटाचे घेरास तूट पडणार नाहीं. (आकृती १५ पहा.) ह स न ही कळी. वरील दोन आकृतींपैकीं दुसरी प्रमाणें कळी भरल्यास गळेपट्टींत फेरफार करण्याची अवश्यकता नाहीं. पोटाचे घेराप्रमाणें कापड घेतलें असून जर डांच घेतला नाहीं तर गळेपट्टी छातीवर झोलती पडेल ह्मणून डांच घेऊन मधील डांचाचें कापड काढून टाकिल्यानंतर गळे-






पट्टी बसवावी. आग्याचे दोन्ही पड्याचे वरील कोंपरे गळेपट्टी बसविण्याकरितां तिरपे छाटावे लागतात, तो तिरपा छाट देण्याचेपूर्वी डांच घेऊन मधील भाग काढून टाकून डांचाच्या दोन्ही कडा शिवून घ्याव्या नंतर तिरपा छाट घ्यावा. तिरपा छाट प्रथम देऊन जर डांच घेतला तर डांचाच्या दोन्हीं बाजू कमी जास्त लांबिच्या होतील; व त्यामुळें त्या बाजू शिवल्या नंतर एक बाजू जास्त वाढलेली दिसेल व ती पुन्हा छाटून टाकिल्यानंतर पड्याचा कोंपरा जास्त खोलगट होईल. (आकृती १६ व्हा) ह स न डांचाच्या ह स आणि स न ह्या बाजू कमी जास्त आहेत करितां डांच घेणें तो ह स

आणि स न ह्या बाजू एकाच लांबिच्या राहतील असा घेतला पाहिजे.

रामा०– तूं मागें म्हटल्याप्रमाणें दुहेरी गुंड्याची बंडी सांगणार होतास ना?

गोविंदा०– ह्या व बाराबंदींत कांहीं विशेष फरक नाहीं. आग्यावर बंदा ऐवजीं बटणांची तजवीज केलेली असते. बाराबंदींत साधे हात लाविलेले असतात. व ह्या दुहेरी गुंड्याचे बंडीस हात कोटाच्या बाह्याचे आकाराचे असतात दुहेरी गुंड्याचे बंडीस कापड कोठयाचे सवापट मात्र घ्यावें बाराबंदीप्रमाणें जास्त कापड घ्यावें लागत नाहीं. कोठयाचे सवापट कापड



घेऊन त्याची दुघडी कर. कापडाची दुमड (अ ब) ही कण्यावर बसेल. मुंढा पिछा आगा पिछाचीं आढीं हीं सर्व बाराबंदी प्रमाणेंच असतात. हें आकृती वरील दिलेल्या मापांवरून दिसून येईल. कमर फार बारीक

असल्यास व अवश्यता दिसल्यास कमरेचे आधार रेषे-वर ह्मणजे अ पासून खालीं १७ इंचावरील कमरेचे रेषेवर कुशीवरील उभ्या रेषेचे ठिकाणीं (ह्मणजे कण्या-पासून १२ इंच अंतरावर), व पाठीवरील रेषेवर कोठा व कमर यांचे अंतराचे मानानें डांच घेण्याची पद्धत आहे. आकृतींत क ही खूण **पंधरा इंचावर** ($\frac{१५}{१६}$) आहे. हा आढ्यावरील गळ्या जवळचा बिंदु आहे. येथून गळ्याचा मध्य **तीन इंच** ($\frac{१}{१६}$), आकृतींत इ पहा ही खूण कोठ्याचें अर्ध माप ह्मणजे **आठरा इंच** असली पाहिजे. या गळ्याचे मध्या पासून ह्मणजे इ पासून **तीन इंचावर** ($\frac{१}{१६}$) ड खूण कर. इ पासून खालीं फ पर्यंत **तीन इंच** ($\frac{१}{१६}$). क फ ड हा गळ्याचा छाट. इ पासून कडेच्या बटणांची रांग जितके अंतरावर घ्यावयाची तितकेच अंतरावर इ चे दुसरे बाजूस बटणांची रांग करावी. गळ्याचे मध्य बिंदू पासून कडे पर्यंत एकंदर कापड **साडे चार इंच** ($\frac{१}{४}$) शिल्लक आहे. ह्मणजे गळ्याचे छाटा पुढें दीड इंच कापड शिल्लक राहतें. याच उभ्या रांगेवर बटणांच्या खुणा कराव्या. आकृतींत खुणा केल्या आहेत त्या पहा. गळा मुंडाच ठेवितात. ह्मणजे आंतून एक अर्ध इंच रुंदीची पट्टी मजबुती करितां लाविलेली असते. या बंडीस बाही लावणें ती साधी

लावितात. किंवा मर्जी असेल तर कोंपरा पर्यंत ठेवितात. अगर कोटाच्या तऱ्हेची बाही लावितात. साधी अगर कोंपरा पर्यंतची बाही लावणें ती बारावंदी प्रमाणेंच बगलसह लावावी.

कोटाच्या तऱ्हेची बाही लावणें असल्यास पाठीचे रुंदीचें व पुढें कोंपरा पर्यंत व पुढें मनगटा पर्यंतचे अशीं मापें घ्यावीं. पाठीचे रुंदीचें माप एकंदर लांबींत वजा करून बाकी इतका लांबीचा व **अठरा इंच** (कोठ्याचें अर्ध) रुंदीचा तुकडा घेऊन त्याची उभी दुघडी करा.

य र प ह हीं दुघड. **य र सवादोन इंच** (९/८).



यम नऊ इंच (बाहीची निम्मे रुंदी) **य न** सहा इंच (९/३). **न ट** सवा इंच. **म ट र म** असा गुंड्याचा छाट कापावा. **म ट र** गुंड्याचा वरील (ह्मणजे **नराचा** छाट), **व म र** हा खांके खालील छाट (बाहीचे मादीचा छाट) होय. **ह प** दीड इंच. **म प** इतकें **म स** असें अंतर घ्यावें. **स प** सहा इंच किंवा (९/३) **म ल स** असा गोल

छाट घ्यावा. हा कॉंपरावर येतो य इ बाजूवर आकृ-
तींत दाखविल्या प्रमाणें थोडा मर्जीस वाटल्यास खळगा
घ्यावा. तसा छाट घ्यावा अगर खळगा न घेतां मुळींच
छाट दिला नाहीं तरी चालतें.



प्रकरण ३ रें पेटी.


रामा०-गोविंदा! तूं जी माहिती सांगतोस ती जणूं काय अनुभवशीर मनुष्या प्रमाणें असते.

गोविंदा०-अरे अनुभव कसला ज्यांनीं आपलीं आयुष्येंच्या आयुष्यें धंद्यांत घालविलीं आहेत ते सुद्धां ह्मणतात कीं, आह्मांसही अद्याप पुष्कळ शिक्षण मिळवावयाचें आहे. मग माझी कसली गोष्ट घेऊन बसलास तें कांहींही असो. मी जी माहिती देत आहें ती तुला चांगली मार्गदर्शक होईल. असो. आतां पेटीची माहिती सांगतों.

रामा०-बरें आहे. सदऱ्याची आणि बन्यानाची जी तूं माहिती सांगितलीस त्या मापांचे अनुमानावरून मला असें वाटतें कीं, पेटीकरितां (१) कोठ्याचें माप घ्यावें लागेल. पेटीस कांहीं हात नसतात ह्मणून बाहीचें माप घेण्याची अवश्यकता नाहीं. (२) पाठीचे रुंदीचें माप, (३) उंचीचें, (४) तसेंच गळ्याचे घेराचें व (५) मुंढ्याचे घेराचें अशीं मापें घ्यावीं ह्मणजे पुरेशीं होतील. नाहीं बरें गोविंदा?

गोविंदा०-रामा तुझें अनुमान बरोबर आहे. अशीं सर्वच मापें घ्यावीं लागत नाहींत; परंतु ज्याला मापांचें तत्व कळलें नाहीं त्यानें प्रत्यक्षच मापें घेऊन काम करावें हें बरें. मुख्य प्रमाण मापावरून बाकीचीं मापें जरी

काढितां येतात तरी तीं सर्वांसच साधतील असें नाहीं एकंदर कामाचे अनुभवानें कोणते पद्धतीचें अवलंबन करावें हें ठरवितां येईल. कोठ्याचे घेरापेक्षां तीन अगर चार इंच जास्त रुंदीवा व वापरणाराचे मर्जी प्रमाणें उंचीचा तुकडा घेऊन त्याची उभी दुघडी (उंचीवर) कर. (आकृती १९ पहा) य इ ही दुमड. या दुघडी पैकीं एक तुकडा आगा व एक पिछा समजू दोन्हीं तुकडे (आगा व पिछा) सुटे करण्याची जरूरी नाहीं. कपडा आंगांत घातला असतां उजवे बाजूस ही दुमड येते व डावे बाजूवर सुट्या बाजूंस बंद लावितात. बंदांच्या खुणा शून्यांनीं दाखविल्या आहेत. य इ व र फ नऊ इंच ($\frac{1}{2}$) मध्य रेषेचे दोन्हीं बाजूंस. य र रेषेवर तीन तीन इंच अंतरावर ($\frac{1}{6}$) अ ब, या



ठिकाणीं खुणा कर मध्य रेषेवर खालीं ट येथें तीनइंचांवर ($\frac{1}{6}$) खूण करून अ ट ब असा आग्याचे पदरावर छाट घ्यावा. अ क व ब ड आडें

पांच इंच ($\frac{?}{?}$) क आणि ड ह्या मुंड्यावरील आढ्याच्या खुणा कडेपासून दोन इंच आंत घ्याव्या. खांकेखालील मुंड्याचा इ व फ ह्या खुणा नऊ इंचावर ($\frac{?}{?}$) आहेत. क म इ व ड ग फ असे आयाचे मुंड्याचे छाट कडेपासून तीन इंच ($\frac{?}{?}$) अंतरावर आंत जरा गोल असे घ्यावे. आग्यावरील बिंदु ह्मणजे गळ्याचे छाटाचे अ व ब, मुंड्याचे क व इ आणि ड व फ, हेच बिंदू पिछाचे गळ्याचे छाटाचे व मुंड्याचे छाटाचे होत. पिछाचे गळ्याचा छाट अ द ब असा मध्या पासून खालीं अर्धा इंचावरून घ्यावा व पिछाचे मुंड्याचा छाट क प इ व ड न फ असे कडेपासून आंत दोन इंच अंतरा वरून घ्यावे मुंढा व गळा यांच्या कडा आंतून अर्ध अगर पाऊण इंच रुंदीची पट्टी बसवून शिवतात ह्मणजे कापणीमुळें गळा व मुंढा यांचीं सुतें सुटतील तीं सुटणार नाहींत व त्यांचे गोल भाग ताणून वाढणार नाहींत. शिवाय गळा व मुंढा हे ह्या पट्टीमुळें मजबूत होतात कारण या भागांस वारं-वार विशेष ताण पडत असतो. कपडा आंगांत घातला असतां उजवे बाजूकडे बसणारें आढें शिवून डावेकडील आढ्याच्या आग्याच्या व पिछाच्या बाजू आंतून अर्ध अगर पाऊण इंच रुंदीच्या पट्या जोडून शिवतात व त्या बाजूवर गळा व आढें यांचे संधीवर ह्मणजे ब

बिंदूवर आणि आडें व मुंढ्याचें संधीवर म्हणजे ड बिंदूवर बंद लावितात म्हणजे पेटीस एकंदर आढ्यावरील चार व डावे बाजूवरील सहा मिळून दहा बंद असतात शिवाय आग्यावर पुढें मध्य भागीं खालीं सदऱ्याचे आग्याप्रमाणें एक खिसा व एक घड्याळाकरितां खिसा मर्जी असेल तर लावावा.



प्रकरण ४ थें कबजा.

रामा०–पेटीच्या मापांप्रमाणेंच मापें कबजाकरितां घ्यावीं लागतील ना?

गोविंदा०–तशा मापांनीं काम होणार नाहीं. कबजा अंगांत घातला ह्मणजे तो अंगाशीं भिडून बसला पाहिजे ह्मणजे ज्याची कमर बारीक आहे त्याचे कमरेस कबजा झोलता न राहतां कमरेशीं सारखा बसला आहे असें बाहेरून दिसलें पाहिजे या मुळें यांत (१) कोठ्याचे माप शिवाय (२) कमरेचें घेराचें माप घ्यावें लागतें. पेटी प्रमाणें नुसतें उंचीचें माप घेऊन चालत नाहीं. (३) उंचीचें माप घेऊन ह्मणजे साधारण मानानें ढुंगणापर्यंतचें माप घेऊन गळ्यापासून कमरेचे बारीक भागापर्यंतचें उंचीचें माप घ्यावें शिवाय पाठीचे रुंदीचें, गळ्याचे घेराचें, अशीं मापें जरूर वाटल्यास घ्यावीं.


रामा०–बनान्याप्रमाणेंच कोठ्याकरितां कापड घ्यावें लागतें ना?

गोविंदा०–बन्यानाप्रमाणें सवापट कापड घेण्याची गरज नाहीं कोठ्यापेक्षां चार पांच इंच कापड रुंद असलें ह्मणजे चालतें. बन्यान कापण्याची माहिती सांगतांनां कापडाची रुंदी कण्यावर मोडून दुघडी घालण्यास सांगितली होती, आतां कबजाची कापणी तशी

न सांगतां आगा व पिछा निरनिराळे कापण्याची पद्धत सांगतों ह्मणजे कापडाचा पन्हा जसा कमी अगर अधिक रुंदीचा असेल तसे तुकडे करितां येतील. जशा रुंदीचें कापड असेल त्या मानानें धोरणानें कापड फुकट न जातां आपल्याला कापडाचे निरनिराळे तुकडे करितां येतील अशा रीतीनें कापडावर प्रथम रेषा काढून आकृति काढावी.

रामा०-- कबजा कापतांनां आगा व पिछा निरनिराळे कापितां येतात काय?

गोविंदा०- होय. हें तुला आतांच समजेल कापडाचे पन्ह्याचे मानानें अशा दुघडी पुरता तुकडा एकदम न मिळाला तरी चालतें. दोन सुटे तुकडे घेऊनही काम भागतें, मात्र दुवडीवर शिवण घालावी लागते



यामुळें पाव इंच जास्त रुंदी घ्यावी लागते (आकृती २० पहा) अ ए अशा नऊ इंच ($\frac{9}{2}$) रुंदीचा व अ प अशा एकंदर उंचीचा एक तुकडा घ्यावा. अ क अर्धा इंच अ ड तीन ($\frac{9}{6}$) इंच अ ई नऊ ($\frac{9}{2}$) इंच. कमरेच्या बारीक भागाची मानेपासूनची उंची अ म

अशी घ्यावी, व अ प एकंदर उंची अ ड इ म प पासून काटकोनांत रेषा काढाव्या. ह्या पिछाचे आकृतींतील अ प ही दुमड अगर शिवण पाठीचे कण्यावर बसणारी आहे.

रामा०– शिंपी लोकांजवळ काटकोन वगैरे कोठें असतात?

गोविंदा०– तुझ्या ह्या खेडे गांवांतील शिंप्यांपाशीं काटकोन वगैरे हत्यारें ज्यांची जरूरी लागेल अशीं नसलीं ह्मणून सर्वच कांहीं तसे आहेत काय? काटकोन जरी त्यांपाशीं नसला तरी अदमासानें काटकोनाचें काम करून घेतात जो पद्धतशीर काम करणारा आहे व तशाच कामाची जेथें अवश्यकता असते तेथें त्या त्या लोकांजवळ जरूरी पुरतीं हत्यारें बाळगलेलीं असतात. कपडा कापण्यास टेबल वगैरे, रेषा काटकोनांत आंखून काढण्याकरितां काटकोन, खुणा करण्याकरितां निरनिराळ्या रंगाच्या वड्या, उत्तम कातरी, इंच आंखलेली फीत (टेप) अगर तसू रेखाटलेली पट्टी वगैरे सामान प्रत्येकाच्या सवईप्रमाणें व अवश्यकते प्रमाणें मिळवावें लागतें. बाकी एवढें खरें कीं, प्रत्यक्ष काटकोनांत रेघ मारून घेणें हें अनुमानानें काम करण्यापेक्षां किती तरी बरें?

रामा०— पाठीचे ह्मणजे पिछाचे जसे हे दोन तुकडे कापावयाचे तसेच आग्याचेही दोन कापावे लागती.ल?

गोविंदा०— तें मग समजेल. आतां आकृतीकडे लक्ष दे. पिछाचे (पाठीचे) भागावरील गळ्याच्या छाटा करितां अ ब तीन ($\frac{1}{६}$) इंच व अ क अर्ध इंच अंतर घेऊन क ब असा पिछाचे गळ्याचा छाट घ्यावा. हा छाट प्रथम न देतां मागाहून गळपट्टी लावितांना दिला तरी चालतो. ड य सात इंच ($\frac{१}{३}$ अधिक एक इंच ह्मणजे पाठीची रुंदी घेतली असल्यास पाठीचे रुंदीचें अर्ध). इ फ नऊ इंच ($\frac{१}{२}$) म न कमरेच्या घेराचा चवथा हिस्सा अधीक १ इंच. प स हें अंतर म न पेक्षां एक दोन इंचांनीं जास्त ठेवावें. ह्मणजे कपडा वापरणाराच्या कमरेचा घेर व ढुंगणाच्या वरचे भागाचा घेर यांकडे लक्ष देऊन त्याप्रमाणें ढुंगणाचे वरचे भागाचे घेराच्या चतुर्थांशापेक्षां एक इंच जास्त अंतर घ्यावें. ब य हें आढें. य फ हा मुंढ्याचा छाट. फ न स अशी रेघ मारावी. एखाद्या मनुष्याची कमर बारीक असल्यास म येथें अर्ध पाऊण इंच खळगा घेऊन आकृतींत दाखविल्याप्रमाणें डांच द्यावा. क प स न फ य ब ही पिछाची आकृती झाली.

रामा०— कायरे गोविंदा, मी तुला वेडेवांकडे प्रश्न विचारतों याबद्दल तूं रागाऊं नकोस. सागितलेल्या

सर्वच गोष्टी एकदम लक्षांत न राहिल्यामुळें कदाचित् तेच तेच प्रश्न विचारले असें होईल ह्मणून सांगतों.

गोविंदा०- त्याचारे कसला राग, साधारण तऱ्हेनें कादंबरी, नाटकें वगैरे प्रकारचीं पुस्तकें वाचतांनासुद्धां मागील पुढील संबंध बरोबर रितीनें कांहीं मंडळीच्या एकदम लक्षांत येत नाहीं. मग हा विषय तर शास्त्रीय विषयासारखाच, याचे अभ्यासांत विशेष परिश्रम होणार, यांत संशय नाहीं.

कबजाचे आग्याकरितां उंची इतका लांब व अकरा इंच ($\frac{2}{3}$ उणे एक इंच) रुंद असे दोन तुकडे पाहिजेत. असे दोन तुकडे एकावरएक ठेऊन मापांच्या खुणा करून कापितां येतात (आकृती २१ पहा) आकृतींतील अ ब रेषा ही छातीवरील उभी मध्यरेषा आहे. अ ब ही उंची. क ह अकरा इंच ($\frac{2}{3}$ उणे एक इंच) ही रुंदी. असा हा तुकडा आहे, ह्मणजे पिछाचे ९ इंच ($\frac{1}{2}$) रुंदींत आग्याची अकरा इंच रुंदी मिळविली ह्मणजे कोठ्यापेक्षां चार इंच कापड जास्त होईल गळ्याचे छाटाकरितां अ पासून तीन इंचावर ($\frac{1}{6}$) र ही खूण कर. अ पासून नऊ इंचावर ($\frac{1}{2}$) क ही खूण. व अ पासून म येथें कमरेची उंचीची सतरा इंचावर (कोठ्याचे घेराचे अर्धा पेक्षां

इंच दीड इंच कमी), अशा खुणा कर. अ क म आणि ब पासून अ ब रेषेवर काटकोनांत अ ज, क ह; म प, आणि ब न अशा रेषा काढाव्या. अ ल साडेचार इंच ($\frac{१}{४}$). ल र असा गोलाकार छाट ध्यावा. र पासून आंत सुमारें अर्धा पाऊण इंचावर खूण करून



त्या खुणेपासून क पर्यंत वांकदार रेषा आकृतींत दाखविल्याप्रमाणें काढावी क ड आठ इंच ($\frac{४}{९}$). ड ह तीन इंच ($\frac{१}{६}$). ड पासून ड स फ ज असा लंब काढावा. (काटकोनांत रेघ काढावी). ड स दीड इंच ($\frac{१}{१२}$). आणि ज फ एक इंच. फ इ गुण्यांत रेघ काढ. ल इ हें आग्यावरील आळ्याचें अंतर पिछाच्या आळ्याचे अंतराबरोबर ध्यावें; नंतर इ स ह असा मुंढ्याचा छाट ध्यावा. कमरेच्या घेराच्या चौथाई पेक्षां एक इंच जास्त असें म प अंतर ध्यावें व ह प न असा छाट द्यावा या छाटास ह पासूनच एकदम सुरुवात न करितां दीड अगर दोन इंचांनंतर करावी. पिछाचे खालील घेरास जसें (पिछाची आकृती पहा) प स हें अंतर म न

पेक्षां एक इंचानें जास्त घेतलें आहे तसेंच आग्यावरही ब न हें अंतर घ्यावें. या प्रमाणें आग्याचे दोन तुकडे तयार केले पाहिजेत ते पिछाशीं ह प न बाजूवर जोडावयाचे असतात. व टोंकाशीं जरा गोल छाट घ्यावा. अगर आहे असाच कोंपरा ठेवावा कबज्यास आग्यावर म प रेषेचे जरा खालीं सुमारें एक दीड इंचावर खिसे करून शिवून लावितात. व डावे बाजूस आख्यापासून नऊ इंचाखालीं एक घड्याळाकरितां लहानसा खिसा करून शिऊन लावितात हे खिसे आवडीप्रमाणें लहान मोठे असतात. घड्याळाचे खिशाची रुंदी तीन इंचाहून व लांबी चार साडे चार इंचाहून कमी नसावी व खालील खिसे पांच इंच रुंद व सहा इंच लांब या पेक्षां कमी नसावे. उजवे बाजूचे आग्याचे पदरास बटणें टांचितात. हुकाचीं बटणें वापरणें असल्यास वाटोळे काजे करितात व डावे पदरास बटणें घालण्यास घरें करून काजे तयार करितात. कबजास मर्जी तर गळपट्टी लावितात अगर गुंडाच ठेवितात. गळपट्टी उभी (स्टॅंडिंग कॉलर) गळ्याचे घेरास पुरेल अशी लावितात. (आकृती ५।६ पहा)

प्रकरण ५ वें साधाकोट.

रामा०– कोटामध्यें किती तरी प्रकार दिसून येतात. परंतु प्रथम साधे कोटाची माहिती सांग पाहूं ?

गोविंदा०—बन्यान, पेटी, कबजा या संबंधीं जीं मापें तुला सांगितलीं त्यांवरून मुंढ्याचे छाटा करितां कुशीवर माप किती उतरावें लागतें त्याचें अनुमान तुला आतां चांगलें करितां येईल. कोठ्या सभोंवतीं पेहेरावयाचे कपड्यांत मुंढ्याचे माप बहुधा सारखेंच ह्मणजे कोठ्याचे एक चतुर्थांश इतकेंच उतरावें लागतें. मुंढ्यांचा जो छाट घ्यावा लागतो त्या पैकीं पिछाचे तुकड्या वरील छाटा पेक्षां आग्याचे तुकड्याचा छाट ज्यास्त खोंचता असतो. सदरा, बन्यान, या कपड्यांत गळ्या पासून कमरेच्या बारिक भागाची उंची व कमरेचा घेर या मापांची जरूरी लागत नाहीं कारण ते कपडे आंगाशीं विशेष भिडून बसणारे नसतात, कबजा कोट, जाकीट, हे कपडे आंगा बरोबर बसणारे असल्यामुळें गळ्या पासून कमरेच्या बारिक भागा पर्यंतची उंची व कमरेचा घेर या मापांची जरूरी लागते. आतां सांग पाहूं, रामा, साध्या कोटा करितां कोणतीं मापें घ्यावीं लागतील ?

रामा०-साध्या कोटा करितां (१) कोठ्याचें,

(२) कमरेच्या बारिक भागापर्यंतच्या उंचीचें, (३) एकंदर उंचीचें. (४) गळ्याचे घेराचें, (५) बाहीच्या लांबीचें, शिवाय पाठीच्या रुंदीचें, हीं मापें घेतलीं तर बरें.

गोविंदा०—अशींच मापें घ्यावीं. साधा कोट हा सईल (ह्मणजे पोकळ) असल्यामुळें यास कमरेच्या घेराचें माप घेतलेंच पाहिजे असें नाहीं परंतु कोटाचे मापाशीं कमरेच्या घेराचें माप कसे प्रमाणांत आहे हें अनुमानानें ताडिलें पाहिजे. कबजाप्रमाणेंच प्रथम पिछा कसा कापावा हें सांगतों (आकृती २२ पहा). पिछाकरितां अकरा इंच रुंदीचा ($\frac{५}{८}$ अधीक एक इंच)



व एकंदर उंची इतके लांबीची दुघडी कर. अ ब ही दुमड. अ ब रेषेवर अ पासून इ येथें अर्ध इंचावर खूण करावी. पिछाचे गळ्याचे छाटाकरितां अ पासून तीन इंचावर ($\frac{१}{८}$) फ खूण करून घे. इ फ असा गळ्याचा छाट. अ पासून क तीन इंचावर ($\frac{१}{८}$) ड नऊ इंचावर ($\frac{१}{२}$), ण सतरा इंचावर (मानेपासून कमरेची बारिक भागाची उंची), आणि ब एकंदर उंचीवर,

अशा खुणा कर. क ड ण ब या बिंदुपासून काटकोनांत रेषा काढाव्या. क च आठ इंच ($\frac{४}{८}$) माप घे. फ च अशी जरा बांकदार रेषा काढावी. हें पिछाचे तुकड्यावरील आडें. ड न ($\frac{५}{८}$) दहाइंच. च न अशी बांकदार रेषा काढावी. हा पिछावरील मुंढ्याचा छाट. सदरहु छाट घेतानां जो बांक द्यावा लागतो तो कण्यापासून पाठीचे रुंदीचे आंत कधींहि देऊ नये. ह्मणजे च पासून ड न वर जर लंब काढला तर त्याचे बाहेर तो छाट होईल. ब द अकरा इंच ($\frac{५}{८}$ अधीक एक इंच) घ्यावें. ण ल या कमरेच्या रेषेवर ल येथें न द रेषेचे आंत एक इंच खळगा देऊन न ल द असा छाट घ्यावा अगर न द असा सरळच भाग ठेवावा. कमर बरीच बारिक असल्यास ण येथें एक इंच खळगा घेऊन आकृतींत दाखविल्या प्रमाणें कण्यावर शिवण घालावी. अ ब ही पिछाची कण्यावरील दुमड न कापितां तशीच राहूं द्यावी. अगर आवड असेल तर पिछाचे दोन्ही तुकडे निरनिराळे करून मग पाठीचे कण्यावर शिवावे. कमरेच्या रेषेवर ण आणि ल येथें जो खळगा एक एक इंच घेण्याचा असतो तो कमरेच्या घेराकडे लक्ष देऊन घ्यावा. ह्या ठिकाणीं छाट दिल्यानंतर जो कमरेचा घेर राहील तो कमरेचा घेर

अधीक चार इंच इतका घेर राहिला पाहिजे इ ब द ल न च फ ही पिछाची दुघडी आहे.

रामा०- आगा व पिछा या दोहोंस जितक्या रुंदीचें कापड लागेल तितकें एकदम घेऊन दुघडी करून बन्यानाचे कापणीप्रमाण जर आगा व पिछा एकदम कापले तरीहि कांहीं हरकत नाहीं असें वाटतें.

गोविंदा०- तसें केलें तरी हरकत नाहीं खरी; परंतु असें केलें असतां कापड जास्त लागून आगा व पिछा या मधील छाटाचे तुकडे फुकट जाण्यासारखे निघतील. आगा व पिछा निरनिराळे कापिले ह्मणजे एके ठिकाणीं कापले असतां कापडाची फुकट जाणारी कसर उपयोगांत आणितां येते. ही गोष्ट व याचसारख्या दुसऱ्या काटकसरीच्या गोष्टी अनुभवानें साध्य होतात. धंद्यामध्यें एक असा अनुभव असतो कीं कामास काम शिकवितें. कोणत्याहि कृत्यांत एकादी अडचण उत्पन्न झाली अगर एकादी चूक झाली कीं, त्या अडचणींतून पार पडण्यास काय उपाय योजावा, याचा विचार चालू होतो अगर झालेली चूक कशी दुरुस्त करावी, याचा विचार सुरू होतो; हा विचार सुरू झाला ह्मणजे उत्तम दर्जाचा मनुष्य तेव्हांच उपाय शोधून काढितो. मध्यम मनुष्यास विचार सुचला नाहीं तर तो दुसऱ्याचें मत घेऊन काम करितो, आणि कनिष्ट प्रतीचा मनुष्य

हताश होऊन हातचें काम अर्धवट टाकून देतो. असा अनुभव पदोपदीं येतो. असो! तुला आतां आगा कापडावर कसा बसवावा तें सांगतों. एकंदर कोटास जितकी उंची ठेवावयाची असल तितके उंचीचे व बाग अगर तेरा इंच रुंदीचे दुहेरी तुकड्यावर आगा बसवितां येतो. आग्याचे हे दोन्हीं तुकडे सुटे करावे लागतात अ ब ही उंची. अ पासून ण येथें तीन इंचांवर (१/६) खूण करावी. क येथें सहा इंचांवर (१/३) ड येथें नऊ इंचांवर (१/२) व इ येथें सतरा इंचावर (कमरेच्या बारिक भागापर्यंतचे उंचीवर) अशा खुणा कराव्या.



अ क ड इ ब पासून अ ब रेषेवर गुण्यांत रेषा काढाव्या. गळ्याचे छाटाकरितां अ फ असें साडेचार इंच (१/४) अंतर ध्यावें ण पासून आंत अर्धा इंच अंतरावरून फ स असा गळ्याचा छाट द्यावा. स पासून क पर्यंत तिरपी रेषा निळवून द्यावी. (चित्राची आकृती २२ पहा) चित्राचें अर्धे फ च याची जितकी लांबी असेल

तितकीच फ न लांबी घ्यावी. प पासून एक इंच अंतरावर खालीं न बिंदु घ्यावा. क ल सवाआठ इंच ($\frac{१}{३}$ + $\frac{१}{८}$). ड ग अकरा अगर बारा इंच ($\frac{२}{३}$ उणें एक इंच अगर $\frac{२}{३}$). न ल ग असा आग्यावरील मुंढ्याचा छाट. (पिछाची आकृती २२ पहा) पिछाचे न ल द बाजूप्रमाणेंच आग्यावरील ग त ज ही कुशी वरील बाजू तयार करावी. कोटाचे आग्यावरील पुढील बाजूवर ह्मणजे ज्या ठिकाणीं बटणें लावावयाचीं असतात व काजे करावयाचे असतात त्या बाजूला आंतून सुमारें चार पांच इंच रुंदीची एक पट्टी जोडितात (आकृतींतील बिंदु रेषा पहा). सदरहू पट्टी गळ्याजवळ रुंद ठेवून खालीं निमुळती करून लावितात. सदहू पट्टी आंतून जोडली ह्मणजे आग्याची कड जरा जास्त बळकट होऊन बटणें टांचण्याचे ठिकाणीं दुहेरी कापड आल्यामुळें बटणें भक्कम बसतात. अगर कडीचीं बटणें अडकवीणेचीं घरें असल्यासहि दुहेरी कापड असल्यामुळें घरें मजबूत होतात. तसेंच उजवे बाजूचे आग्याचे कडेसहि काजे करावयाचे असतात त्या ठिकाणींहि दुहेरी कापड असल्यामुळें काजे मजबूत तयार करितां येतात. कोणी कोणी सदहू पट्टी लावण्याच्यापूर्वी आग्याचा पदर व ही पट्टी यांचे मध्यें जरा जाड कापडाची भर देतात, ह्मणजे आग्याच्या कडा जास्त ताठ राहतात.

कबजाचे आग्यावर खिसे कसे लावावे ह्मणून जें तुला सांगितलें आहे त्या प्रमाणें सदर्हू कोटाच्या आग्यावरही खिसे लावावे. हे खिसे कबजाच्या खिशा पेक्षां जरा मोठे असावे. शिवाय आवडी प्रमाणें अवश्यकता असेल तर आग्यास आंतून लांबोडे मोठे खिसे लावण्याचा परिपाठ आहे आग्याचे कडेला बटणें ज्या कडेला लावितात, अगर काजे ज्या कडेला कारितात त्या कडेवर गळ्याचे छाटापासून नऊ इंचां नंतर हात शिरकेल असें तोंड ठेवितात.

सदर्हू आग्याच्या खालील व तोंडाशीं आवडी प्रमाणें गोल छाट देतात अगर कोंपरे ठेवितात. सदर्हू गोल छाट कमी जास्त आवडी प्रमाणें देणेची पद्धत आहे. आग्याचे दोन तुकडे व पिछा यांचे खालील कडा (घेर) आंतील बाजूस चपट्या दुमडून शिवण्याची पद्धत आहे. सदर्हू कडा दुमडतांनां पिछाच्या कुशीची बाजू व आग्याचे कुशीची बाजू यांचे संधीवर खालीं ह्मणजे आग्याची ज व पिछाची द या बिंदूशीं शिवणींत कोंपरा म येईल असे रितीनें आगा व पिछा याची खालची कड (घेर) अवश्यकता असल्यास जरा छाटून शिवावी.

सदर्हू कोटांस जी गळेपट्टी लावितात ती बहूधां उभी (स्टँडिंग) लावावयाचा प्रघात आहे. दीड इंच रुंदीची

व गळ्यास पुरेल इतकी लांबीची दुहेरी पट्टी गळ्याचे काटास बसवितात. ही पट्टी सरळ अशी बसविण्या पेक्षां सहाव्ये आकृतींत दाखविल्या प्रमाणें बांकदार अशी तयार करून बसवावी म्हणजे कोट अंगांत घातल्यावर ही गळेपट्टी (कॉलर) उभी तरतरीत राहते. (सदरा आकृती ६ पहा). सदहू साध्या कोटास जी बाही लावणें ती साधी अगर कोटाच्या चालीची बाही लावावी. साधी बाही लावणें असल्यास मुंढेछाटी सदऱ्याचे बाही प्रमाणें अगर बन्यानाचे बाही प्रमाणें लावावी. (आकृती ८ पहा) कोटाच्या चालीची बाही लावणे वी असल्यास आकृती १८ प्रमाणें लावावी. बाहीच्या मोहळीशीं कापड ताठ राहावें म्हणून सुमारें अडीच तीन इंच रुंदीची पट्टी आंतून बसवून शिवतात.



प्रकरण ६ वें विजार.

रामा०- साध्या कोटाच्या कापणीची जी पद्धत सांगितली त्याप्रमाणेंच तीन शिवणींचें कोट कापण्याची पद्धत असेल?

गोविंदा०- तीन शिवणींचे (थ्री सीमर्स.) कोटाची कापणी जवळ जवळ या सारखीच आहे. परंतु त्यांत जे विशेष फरक आहेत ते पुढें * सांगेन. आतां विजार कशी शिवावी, हें तुला सांगतों. आतांपर्यंत ज्या कपड्याचें वर्णन तूं ऐकिलेंस त्या कपड्यांचें मुख्य प्रमाण कोट्याचे मापाचें होतें. विजार हा कपडा छाती सभोंवतीं पेहेरावयाचे कपड्यां पैकीं नसल्यामुळें त्यांचीं प्रमाणें तो कपडा ज्या अवयवां सभोंवतीं पेहेरावयाचा असतो त्या अवयवां संबंधीं असलीं पाहिजेत, म्हणजे कमरे पासून खालच्या अवयवांची मापें घेण्याची अवश्यकता असते. विजारी करितां बैठकीच्या घेराचें माप हें मुख्य प्रमाण आहे. मापें घेणें तीं, (१) कमरेच्या बाहेरील भागा पासून गुडघ्यापर्यंतचें व तथून टांचे पर्यंतचें अशा उंचीचीं मापें, (२) दोन्ही मांड्याचे मधल्या बेंचका पासून टांचे पर्यंतचें उंचीचें माप, (३) आणि बैठकीच्या घेराचें (ढुंगणाच्या उंचलेल्या भागा सभोंवता-

* सदर्हू वर्णन पुढील भागांत येणार आहे.

घरचा शिंपी भाग १) (प्रकरण ६ वें विजार

लचा घेर) अशीं मापें घेतली ह्मणजे पुरशीं होंतात. शिवाय जरूर असल्यास गुढग्याचे घेराचें व टांचे जवळील घेराचें अशीं मापें घ्यावीं.

रामा०--विजारींत किती प्रकार आहेत ?

गोविंदा०- विजारींत बिन कळ्यांची व कळ्यांची असे दोन प्रकार आहेत. मुलांस विजार शिवावयाची ती बिन कळ्यांची शिवण्याचा प्रघात आहे मोठे मनुष्यास शिवणें असल्यास कळ्यांची विजार शिवतात ह्या दोन्हीं प्रकारच्या विजारी बेतण्याचें तत्व एकच आहे.

रामा०- दोन्ही प्रकारच्या विजारींचें बेतण्याचें तत्व जर सारखेंच आहे तर लहान मुलांस बिन कळ्यांची विजार व मोठे मनुष्यास कळ्यांची विजार अशा शिवण्याचा प्रघात कां आहे ?

गोविंदा०- **बिन कळ्यांचे विजारीस कळ्यांचे विजारीपेक्षां** कापड अधिक लागतें ह्मणून मोठे मनुष्यास विजार शिवण्याची असल्यास बहुधां कळ्यांचीच शिवतात. लहान मुलांस विजार शिवणें ती कळ्यांची शिवली असतां त्याचे मानानें कापड कमी लागेल खरें परंतु लहान मुलांचे विजारींत ह्मणजे **बिन कळ्यांचे** विजारींत फुकट जाणारी कापडाची कसर क्षुल्लक असल्यामुळें मुलांस **बिनकळ्यांचीच** विजार शिवतात. यांत कापडाचे काटकसरीचें प्रमाण किती पडतें हें प्रत्यक्ष

काम करितांना चांगलें दिसून येईल. विजारीचीं पोट प्रमाण मापें जीं आतां सांगणार आहें तीं बैठकीचा घेर छत्तीस समजून त्याचें अर्ध मुख्य प्रमाण धरून सांगणार आहें. ह्मणजे जेथें अमुक हिस्सा ह्मणून सांगितला आहे तेथें बैठकीच्या घेराचे अर्ध्याचा तो हिस्सा आहे असें समजावें.

रामा०—बैठकीच्या घेराइतकें रुंद व एकंदर उंची इतकें लांब असें कापड पुरेल काय?

गोविंदा०—नाहीं. बन्यानास जसें कोठ्याचे सवापट कापड घेऊन बन्यान कापावें लागतें तसें **तुमानीस** (विजारीसही) बैठकीच्या घेराचे सवापट कापड लागतें. ह्या रुंदींत दोन भाग काढावयाचे असतात, ह्मणजे उंचीकरितां कमरेपासून टांचेपर्यंत वापरणाराचे मर्जीप्रमाणें आणि माथ्यावर नाडी घालण्याकरितां (**नेफ्या-**करितां) अडीच तीन इंच इतकें उंचीचें व बैठकीच्या घेराचे सवापट अधिक दोन तीन इंच रुंद इतकें कापड लागतें. असा कापडाचा तुकडा घेऊन त्याचे उभे उंचीवर सारखे मधोमध चिरून दोन भाग करावे. ह्मणजे प्रत्येक भाग एक एक पाय झाला. हे दोन तुकडे उभे दुमडून दुघडीवर दुघडी येईल असे जमिनीवर पसरावे (आकृती पहा.) अ ब र क ही दुघडी अ ब ही दुमड. अ ब रेषेवर अ पासून नेफ्याकरितां घेतलेली

जास्त उंची ह्मणजे अडीच इंच अंतरावर इ बिंदू घ्यावा. येथून ह्मणजे इ पासून एक द्वितीयांश * अधिक दोन अडीचइंच ह्मणजे अकरा साडे अकराइंच अंतरावर ड बिंदू घ्यावा. टांचेपासून बेचकाची उंची घेतली असल्यास



ब पासून ह्मणजे टांचेपासून तितकेच उंचीवर ड ही खूण करावी. फ हा गुडघ्याचे उंचीचा बिंदू इ ड फ पासून काटकोनांत रेषा काढाव्या अ क इ ल ड स ह्या रेषा समान आहत ब ही प्रत्येक हल्लीं साडे अकरा बारा इंच अहे फ पासून फ न हें अंतर गुडघ्याचे घेराचा अर्धा इतकें घ्यावें. तें घेतलें नसल्यास आठ इंच (४ घ्यावें. व य मोहोलीशीं रुंदी सहा इंच ($\frac{१}{३}$) घ्यावी. मोहळी टांचे पाशीं आंवळती हवी असल्यास त्याही पेक्षां कमी करण्यास हरकत नाही परंतु त्यामुळें विजार पायांत घालतानां नड़ नये इतका


* बैठकीच्या घेराचें अर्ध हें मुख्य प्रमाण समजावें.

घेर मोहळीशीं ठेवावा लागतो. स न य अशी रेषा काढावी व स र य असा काप काढून घ्यावा ह्मणजे क स य व थ असा विजारीचा एक पाय झाला.

रामा०– विजारीची कापणी तर अगदींच साधी आहे.

गोविंदा०–होय साधी आहे खरीच. यांत मुख्यत्वें करून बैठकीचा घेर आणि तुमान घातली असतां बसणे उठणेंस नडूं नये ह्मणून कमरेपासून बेंचकापर्यंतची उंची, यांकडे लक्ष विशेष ठेवावें लागतें व या करितांच विजारीस खिस्तक ह्मणून एक कळीसारखा अवयव जोडावा लागतो. नेफ्याकरितां घेतलेली उंची वजा जाता कमरेपासून ह्मणजे ल पासून खालीं स बिंदू (ह्मणजे बेंचकाचे उंचीचा बिंदू) पर्यंतचे अंतराइतकें लांब व नऊ इंच ($\frac{१}{२}$) रुंद असा तुकडा घेऊन त्याच्या उंचीवर दोन तिकोनी कळ्या काढाव्या. (आकृती पहा). ह्या कळीची रुंदीची बाजू नऊ इंच (अर्धा हिस्सा) ठेवावी. या दोन कळ्या वरील तुकड्यांत काढल्या ह्मणजे एक कळी अखंड निघून दुसरी सांध्याची निघेल. सदहू कळ्यांपैकीं एक कळी विजारीचे पुढील भागीं दोन पायांचेमध्यें दोन पायांचे दोन कडांवर (मध्य रेषेवर) व दुसरी पाठीमागील भागीं दोन पायांचे पाठीमागील भागाचे कडेवर (मध्य रेषेवर) जोडण्याची असते व

या जोडकळीस खिस्तक ह्मणतात. प्रत्येक पायाचे मोह-




ळीशीं थोडीशी बाजू आंत दुमडून शिवावी अगर निदान दीड दोन इंचांची पट्टी आंतून जोडावी. नेफ्या करितां अधिक राखलेली बाजू आंत दुमडून नाडी घालण्याकरितां शिवावी. ही बाजू दुमडून शिवतांनां नाडी घालण्यास दोन ठिकाणीं तोंडें ठेवावीं लागतात.

रामा०—बिन कळ्यांचे विजारी प्रमाणेंच कळ्यांची विजार बेतण्याची असते. कळ्या लावतात त्या कोणते ठिकाणीं लावतात.

गोविंदा०—ह्या दोन्हीं विजारींत बेतण्याची पद्धत सारखीच आहे. कांहीं फरक नाहीं. बिन कळयांचे विजारीचे पायांत कमरेपासून गुढघ्यापर्यंत गुढग्याचे घेरा पेक्षां जास्त लागणारें कापड हल्लीं जसें अखंड ठेविलें आहे, तसें कळ्यांचे विजारींत ठेवीत नाहींत. ह्मणजे बिन कळ्यांचे विजारींत बैठकीच्या घेराचे सवापट कापड घ्यावें लागतें तसें न घेतां बैठकीच्या घेरा इतकेंच कापड घेऊन त्यांत पाय काढितात.

रामा०—बिन कळयांचे विजारीप्रमाणें यांत सवापट कापड घेतलें नाहीं ह्मणून बैठकीच्या ठिकाणीं नडूं नये ह्मणून कळ्या देतात काय ?

गोविंदा०—होय. कमरेपासून गुढग्यापर्यंत पायांत जो जास्त भाग बिन–कळ्यांचे विजारींत दिसून येतो तेवढा जास्त भाग त्याच आकाराच्या कळीनें भरून काढि-तात यामुळें कापड थोडें कमी पुरतें. बाकी या कळ्यांचे विजारींत व बिन कळ्यांचे विजारींत कांहीं फरक नाहीं. हें तुझे लक्षांत आलेंच असेल.



प्रकरण ७ वें कपाळपट्टीची टोपी.

रामा०—सदरा, बन्यान, पेटी, कबजा, साधाकोट, हे कपडे छाती सभोंवतीं पेहेरावयाचे असल्यामुळें कोठा हें मुख्य प्रमाण माप धरिलें पाहिजे. तसेंच तुमान (विजार) ही शरीराचे कमरेखालचे भागीं पेहेरावयाची असल्यामुळें बैठकीचा घेर हें मुख्य प्रमाण माप धरावें लागतें. कपाळपट्टीची टोपी ही डोक्याला घालावयाची असल्यामुळें या कपड्याचें मुख्य प्रमाण माप डोक्याचा घेर समजलें पाहिजे. नाहीं बरें गोविंदा ?


गोविंदा०-- मीं तुला जें जें सांगतों त्यावर बराच विचार करितोस असें वाटतें. नाहीं तर वरिल प्रश्न करण्याचें तुला सुचलें नसतें. आतांपर्यंत सांगितलेली माहिती आकृती वरून कशी लक्षांत घ्यावी हें ही समजलें आहे असें दिसतें.

रामा-० शाळेंत सिद्धांताच्या आकृति समजावून देतांना मास्तर अशाच समजावून देतात. त्याचप्रमाणें ही ही माहिती आकृतींवरून समजून घेतां येते. ज्याला ट फ च्या पलीकडे वाचतां येत नाहीं त्याच्या हातांत असलीं पुस्तकें दिलीं असतां त्याला कितपत उपयोग होईल याची शंका दिसते.

गोविंदा०-रामा ! मनोगत विचार एकमेकांस कळवि-

ण्याचीं जीं साधनें आहेत त्यांच्या आभावीं विचार एकमे-कांस कळण्यास मार्गच नाहीं. ह्मणजे अंध मनुष्यास नेत्रेंद्रियाचे साधनानें ज्ञान कधींच करून देतां येणार नाहीं. बहिरे मनुष्यास कर्णेंद्रियाचा उपयोग करितां येत नसल्यामुळें शद्बानें कोणत्याही प्रकारचें ज्ञान होणार नाहीं, मुक्या मनुष्यास आपले विचार शब्दानें दुसऱ्या मनुष्यास कळवितां येणार नाहींत. त्याचप्रमाणें ज्याला वाचतां येत नाहीं त्यास कोणतेही विषयाचें ज्ञान संपादन करणें असल्यास वाचनाशिवाय दुसरे साधनाचा उपयोग करून घेतला पाहिजे हें उघड आहे. बाकी तूं ह्मणतोस तें खरें कीं ज्ञानार्जनाचे कामीं वाचनासारखें दुसरें उत्तम साधनच नाहीं.

गोविंदा०— असो. कपाळ-पट्टीचे टोपी-करितां मुख्य प्रमाण माप डोक्याचा घेर घ्यावा लागतो. घेराचें माप घेतलें ह्मणजे त्यावर टोपीचें काम होतें. ह्या टोपीकरितां डोक्याच्या घेराइतकें रुंद कापड घेऊन त्याची दुघडी कर. (आकृति २६ पहा). अ ब क ड हीं घडी.



अ ग ब ही दुमड. अ ब हें अंतर घेराचा तिसरा हिस्सा. ह्मणजे घेर जर बावीस इंच आहे, तर अ ब ही बाजू

७ $\frac{१}{३}$ इंच होईल. अ पासून उंचीचे तिसरे हिश्शा इतके अंतरावर ग येथें खूण कर. अ ग ही बाजू पुढील भागीं कपाळावर मध्यें येईल. ब पासून ब क बाजूवर डोक्याचे घेराचे एक षष्टांश अंतरावर इ ही खूण करावी. आणि ग इ अशी वाटोळी रेघ काढावी. व ब ग इ असा छाट घ्यावा ह्मणजे ग इ हें वाटोळें तोंड झालें. ड क बाजू शिवून तयार झाल्यावर डोक्याचे पाठीमागील मध्य भागीं उंचीवर येईल. अ ड या बाजूवर चांदवा बसवावयाचा असतो. चांदव्याकरितां कापड घेणें, तें, घेराचे तिसरे हिश्यांत अर्ध इंच कमी, इतके बाजूचें चौरस कापड घेऊन त्यांत वाटोळा चांदवा काढावा. (आकृती २७ पहा) ब हा चांद-



व्याचा मध्य बिंदू आहे. अ क हा चांदव्याचा घेर. हा घेर बाजूचे कापडावर अ ड बाजूवर शिवून बसविण्याचा असतो. बाजूवरील अ ग भाग पुढील भागीं कपाळावर येणार आहे ह्मणून तुला सांगितलेंच आहे. इ बिंदूही पुढील भागीं येणारा आहे. इ येथें बंद लावितात. आणि क इ ग कडा आंत दुमडून शिवतात. ह्मणजे कापड ताणत नाहीं.

आगा– छाती सभोंवतीं पेहेरावयाचे कपड्यांतील छाती-वरील ह्मणजे पुढील मुख्य भाग.

आढें– खांद्यावर आगा व पिछा यांची शिवण ज्या ठिकाणीं येते त्यास आढें ह्मणतात.

कळी– कपड्यांतील एखाद्या भागास कांहीं विवक्षित ठिकाणीं वाढवा आणण्याचा असल्यास गरजेप्रमाणें इच्छित आकाराचा कापडाचा तुकडा जोडण्या करितां घेतात तो. कांहीं कपड्यांत नियमीत तऱ्हेच्या कळ्या जोडावयाच्या असतात. उदा-हरणार्थ-सदरा, आंगरखा, चोळ्या यांच्या कळ्या. व कांहींत कमी अगर अधिक प्रमाणाचा तुकडा जोडावा लागतो. उदाहरणार्थ-बन्यानाची आकृती १९ पहा.

कफ– बाहीचे शेवटीं मनगटाचे भागावर एक पट्टी विशेष तऱ्हेची लावितात तीस कफ ह्मणतात.

काजेपट्टी– काजा ह्मणजे घर किंवा भोंक. बटणें अड-कविण्याकरितां ज्या पट्टीस भोंकें ह्मणजे घरें पाडून तीं घरें विशेष तऱ्हेच्या शिवणीनें शिवतात ती पट्टी. विशेष समजुतीकरितां सदऱ्याचे पुढील भागावरील काजेपट्टी पहा. (आकृती २ पहा)

काजा– घर, भोंक. बटणें बसविण्याकरितां घरें पाडून

त्यांचीं सुतें निघूं नयेत ह्मणून विशेष प्रकारच्या शिवणीनें शिवतात त्या घरांस काजे ह्मणतात.

कोठा– छाती सभोंवतीं पेहेरावयाचे कपड्यांत प्रमाण माप पाठीचे खुब्यावरून खांकेखालून छातीवर मनुष्याचे एकंदर छातीचें घ्यावें लागतें त्या घेरास कोठा ह्मणतात.

गळेपट्टी– छाती सभोंवतीं पेहेरावयाचे कपड्यांतील गळ्या सभोंवतीं बसणारा एक अवयव.

गुंडी– कापडाचा एक लहानसा तुकडा घेऊन त्याचे कोंपरे दुमडून एक सरासरी वाटाण्या एवढी गोळी बटणाचे ऐवजीं उपयोगांत आणण्यास तयार करितात त्यास गुंडी ह्मणतात.

चांदवा– डोक्या सभोंवतालचे कपड्यांत डोकीवर येणारा एक वाटोळा भाग असतो त्यास चांदवा ह्मणतात. उदाहरणार्थ कपाळपट्टीचे टोपींतील आकृती २७ पहा.

डांच– कपड्यांतील कांहीं अवयवापैकीं एखादे अवयवास कांहीं विवक्षित ठिकाणीं आकुंचितपणा आणण्याकरितां त्याच ठिकाणचा कापडाचा भाग अवश्यकतेप्रमाणें काढून टाकावा लागतो त्यास डांच ह्मणतात. उदाहरणार्थ बन्यानांतील आ. १४ पहा.

नर– बाहीचे (कोटाच्या वगैरे) दोन भागां पैकीं वरील भागास नर ह्मणतात. व खालील भागास ह्मणजे खांकेकडील भागास मादी ह्मणतात.

नेफा– नाडी घालवयाकरितां चोळणा विजार इत्यादिकांचा जो प्रदेश तो.

पिछा– छाती सभोंवतीं पेहेरावयाचे कपड्यांतील पाठी कडील मुख्य भाग.

बगल– हा एक चौकोनी अगर तिकोनी तुकडा असतो तो सदरा, बन्यान, वगैरे कपड्यांत हाताचे माध्याशीं खांखेखालीं विवक्षित तऱ्हेनें जोडलेला असतो.

बटणपट्टी / **गुंडेपट्टी** – बटणें ज्या पट्टीवर टांचून लावतात किंवा बटणांच्या कड्या अडकविण्याकरितां ज्या पट्टीस घरें पाडून विशेष प्रकारच्या शिवणीनें शिवतात ती पट्टी.

वाक– वळण, कमान, वक्र रेषा.

बाही– छाती सभोंवतीं पेहेरावयाचे कपड्यांतील हाता सभोंवतीं येणाऱ्या भागास बाही किंवा हात ह्मणतात. बावखडासून मणगटापर्यंत जो कपड्याचा भाग येतो तो.

बिरडें- गुंडी अडकविण्यास कापडाचे लहानसे लांबट तुकड्याची एक वेंटाळी तयार करून ती वाटोळी करून टांचितात तीस बिरडें ह्मणतात.

माथा= वरिल भाग. कोणत्याहि भागाचे दोन कडां पैकीं एकास ह्मणजे शेवटील टोंकास मोहळी व दुसरे ह्मणजे वरील कडेस माथा ह्मणतात.

माया- दोन तुकडे एके ठिकाणीं कडेवर शिवले ह्मणजे जी शिवण पडते त्या शिवणीपासून कडेपर्यंत एक थोडके रुंदीचा भाग राहतो त्या अरुंद भागास माया ह्मणतात. शिवण घातली असतां कापडाचे कडेचीं सुतें निघून जाऊन शिवणीस धक्का लागूं नये ह्मणून कापडाच्या कडेचा कांहीं भाग सुटा ठेवावा लागतो त्यास माया ह्मणतात.

मुख्य प्रमाण-- या पुस्तकांत कपड्यांचे मापांचें प्रमाण सांगितलें आहे तें, कपडा ज्या मुख्य अवयवा सभोंवतालीं पेहेरावयाचा असेल त्याच्या घेराचें अर्ध असें समजावें ह्मणून उल्लेख केला आहे. ज्या ठिकाणी याशिवाय दुसरे एखादे मापाचे हिसे उपयोगांत आणावे ह्मणून लिहिलें आहे, त्याखेरीज बाकी सर्व ठिकाणीं मुख्य प्रमाण माप ह्मणजे मूळ मापाचें अर्ध ह्मणून समजणेचें आहे.

मोहळी– शेवट, कोणत्याही भागाच्या दोन टोंकांपैकीं एकास ह्मणजे शेवटल्या टोंकास मोहळी ह्मणतात. (माथा शब्द पहा) आकृती १, २, ७ व ८ यांत मोहळी व माथा पहा)

हक्क– माया, कांहीं ठिकाणीं कांहीं विशेष कारणाकरितां कांहीं भाग शिल्लक ठेवावा लागतो त्या भागास हक्क ह्मणतात. उदाहरणार्थ तुमानीचें वर्णन पहा.



४४ पासून २४ इंच कोठ्याच्या

खालील कोष्टकांत आरंभीं उभ्या सदरांत मुख्य रेषेवर पोट प्रमाणांचे हिस्से दाखविले आहेत. पोट दोरे असे दिले आहेत. एका इंचांत आठ दोरे सम धरसोडीनें कमी अगर अधिक धरून घेतला आहे.

मुख्य प्रमाण (मूळ प्रमाणाचें अर्ध)	$\frac{१}{२}$	$\frac{१}{३}$	$\frac{२}{३}$	$\frac{१}{४}$	$\frac{३}{४}$	$\frac{१}{५}$	$\frac{२}{५}$	$\frac{१}{६}$
	इं. दो.	इं. दो	इं. दो.	इं. दों	इं. दो.	इं. दो	इं. दो	इं. दो.
२२	११-०	७-३	१४-५	५-४	१६-४	४-३	८-६	३ ५
२१	१०-४	७-०	१४-०	५-२	१५-६	४-२	८-३	३-४
२०	१०-०	६-५	१३-३	५-०	१५-०	४-०	८-०	३-३
१९	९-४	६-३	१२-५	४-६	१४-२	३-६	७-५	३ १
१८	९-०	६-०	१२-०	४-४	१३-४	३-५	७-२	३-०
१७	८-४	५-५	११-३	४-२	१२-६	३-३	६-६	२.७
१६	८-०	५-३	१०-५	४-०	१२-०	३-१	६-३	२-५
१५	७-४	५-०	१०-०	३-६	११-२	३-०	६-०	२-४
१४	७-०	४-५	९-३	३-४	१०-४	२-६	५-५	२-३
१३	६-४	४-३	८-५	३-२	९-६	२-५	५-१	२-१
१२	६-०	४-०	८-०	३-०	९-०	२-३	४-६	२ ०
११	५-४	३-५	७-३	२-६	८-२	२-१	४-३	१ ७

मुख्य प्रमाण मापाचे पोट हिस्से.

प्रमाण मापें दिलीं आहेत व त्यांचे समोर आडव्या हिस्से दाखवितांना जे अंक दिले आहेत ते इंच व जावयाचे आहेत. दोरे देतांना दोऱ्यांचा अंश

५/६	२/७	१/८	१/९	२/९	४/९	५/९	१/१२	५/१२
इं. दो.	इं. दो	इं. दो	इं. दो	इं. दो	इं. दो	इं. दो.	इं. दो.	इं. दो.
१८-३	६-२	२-६	२-४	४-७	९-७	१२-२	१-७	९-१
१७-४	६-०	२-५	२-३	४-५	९-३	११-५	१-६	८-६
१६-५	५-५	२-४	२-२	४-४	८-७	११-१	१-५	८-३
१५-७	५-३	२-३	२-१	४-२	८-४	१०-४	१-४	७-७
१५-०	५-१	२-२	२-०	४-०	८-०	१०-०	१-४	७-४
१४-१	४-७	२-१	१-७	३-६	७-४	९-३	१-३	७-१
१३-३	४-५	२-०	१-६	३-४	७-१	८-७	१-३	६-५
१२-४	४-२	१-७	१-५	३-३	६-५	८-३	१-२	६-२
११-५	४-०	१-६	१-४	३-१	६-२	७-६	१-१	५-६
१०-७	३-६	१-५	१-३	२-७	५-६	७-२	१-१	५-३
१०-०	३-३	१-४	१-३	२-५	५-३	६-५	१-०	५-०
९-१	३-१	१-३	१-२	२-३	४-७	६-१	१-०	४-५

शुद्धीपत्र.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	६	फरसीच्या	फरशीच्या
९	७	जोड शिवणींमध्यें	जोडशिवणीमध्यें
१२	४	लावण्याची	लावण्याचा
१३	१९	मुंढे छाटी	मुंढेछाटी
१३	२३	अकरा	दहा
४१	८	चाछातो	चालतो
४८	११	लांबीची	लांबीचा तुकडा
६०	१३	जोडिला	जोडिली
६२	१०	आकृति ८ पहा	आकृति ११ पहा
६३	२१	पुढीस	पुढील
६६	२१	आकृति पहा	आकृति २४ पहा

